

कुलगुरु कै. वि. गं. तथा
दादासाहेब केतकर



धनुर्धारी श्रीराम लक्ष्मण

विद्यान् सर्वत्र पूज्यते

स्थापना १२ मे १९०९



शिक्षणमहर्षी कै. डॉ. ग. श्री.
तथा अण्णासाहेब खैर


पुणे विद्यार्थी गृहाचे मासिक

# समाचार

**Pune Vidyarthi Griha's 'Samachar' Magazine August 2022 - Pages - 36**

संपादक : श्री. सुनील पांडुरंग रेडेकर    कार्यकारी संपादक : श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे

* पुणे * वर्ष ७३ * अंक १० * किंमत रु. १०/- * वार्षिक वर्गणी रु. १००/-





म्हसरूळ शाखा अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयाच्या १२वा वर्धापन दिन व नूतन कार्यालय उद्घाटन प्रसंगी डावीकडून संस्थेच्या देणगीदार श्रीमती गंगुताई धामणकर, माजी कार्याध्यक्ष प्रा. कृ. ना. शिरकांडे, संस्थेच्या नियामक मंडळाचे उपाध्यक्ष श्री. श्रीधर पाटणकर, प्रमुख पाहूणे नि. ग्रुप कॅप्टन श्री. राजीव केतकर, कार्याध्यक्ष श्री. सुनील रेडेकर, सौ. नंदिनी केतकर, उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, संचालक श्री. संजय गुंजाळ,
मागील ओळ - संचालक सर्वश्री दिनेश मिसाळ व राजेंद्र बोऱ्हाडे, कुलसचिव अमोल जोशी,
प्रा. राजेंद्र कडूसकर, कृष्णाजी कुलकर्णी व सेवकवृंद

## ✲ अभियांत्रिकी व धामणकर व्यवस्थापन महाविद्यालय, म्हसरूळ-नाशिक दि. १३-७-२०२२ ✲



अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयाच्या १२व्या वर्धापन दिनानिमित्त महाविद्यालयाच्या नूतन प्रशासकीय कार्यालयाचे उद्‌घाटन करताना प्रमुख पाहूणे नि. ग्रुप कॅप्टन श्री. राजीव केतकर, सौ. नंदिनी केतकर, कार्याध्यक्ष श्री. सुनील रेडेकर, संस्थेच्या देणगीदार श्रीमती गंगुताई धामणकर, संस्थेच्या नियामक मंडळाचे उपाध्यक्ष श्री. श्रीधर पाटणकर, उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, कुलसचिव श्री. अमोल जोशी, संचालक श्री. संजय गुंजाळ, व श्री. राजेंद्र बोऱ्हाडे



अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयाच्या १२व्या वर्धापन दिनानिमित्त महाविद्यालयाच्या नूतन सभागृहाचे उद्‌घाटन करताना संस्थेच्या नियामक मंडळाचे उपाध्यक्ष श्री. श्रीधर पाटणकर, सोबत प्रमुख पाहूणे नि. ग्रुप कॅप्टन श्री. राजीव केतकर, सौ. नंदिनी केतकर, कार्याध्यक्ष श्री. सुनील रेडेकर व माजी कार्याध्यक्ष प्रा. कृ. ना. शिरकांडे



अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयाच्या १२व्या वर्धापन दिन समारंभात दिपप्रज्वलन करताना प्रमुख पाहूणे नि. ग्रुप कॅप्टन श्री. राजीव केतकर, कार्याध्यक्ष श्री. सुनील रेडेकर, उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, संचालक श्री. संजय गुंजाळ

संपादकीय

# व्हर्चुअल मैत्री

आज आश्रमातील नवीन विद्यार्थ्यांशी गप्पा गोष्टी करत असताना मीही माझ्या शालेय आणि आश्रमीय जीवनाच्या आठवणीत रमलो. माझ्यावेळी असलेले माझे मित्र आणि त्यावेळच्या मित्रांसोबत केलेला अभ्यास, सहजीवन, केलेल्या खोड्या असतील एक ना एक असंख्य गोष्टी डोळ्यासमोरुन तरळून गेल्या.

शालेय जीवनात मैत्री आणि त्याचा अर्थ आणि व्याख्या असे काही असते हे कळायचं ते वयंही नव्हतं. मैत्री म्हणजे काय? खरंतर व्याख्येत बसतं, ते नातं नसतंच कधी. रोजरोज भेटतात, रोज एकमेकांशी बोलतात तेच खरे मित्र मैत्रिण असतात, असं असतं का? किंवा ते खरंच एकमेकांचे चांगले मित्र मैत्रिण असतात का? नाही !

मैत्रीला जात नसते, वेळ नसते, वय नसतं, अट नसते आणि रुपही नसतं. प्रेमाच्या कित्येक पुढे गेलेलं नातं म्हणजे मैत्री. मैत्री म्हणजे असे नाते जे मांडणे शब्दांच्या कुवतीचे काम नसते.

समोरच्याचा त्याच्या गुणदोषासह स्वीकार म्हणजे मैत्री. जगाने आपल्या मित्राला खूप मान द्यावा अशी अपेक्षा नसते, पण त्याचा केलेला अपमान आपल्याला सहन होत नाही, तिथे असते मैत्री.

जिथे मनातलं बोलताना समोरच्याला आपण गमावू अशी भिती नसते, तिथे असते मैत्री. हाताची हातावरली टाळी म्हणजे मैत्री, प्रेमाने केलेली शिवीगाळ म्हणजे मैत्री. रागावल्यानंतर फारतर दोन दिवसांच्या अबोल्यानंतर कोणी पुढाकार घेत नसल्याचे आपल्यालाच जाणवून आपणच पुढे येऊन राग विसरून, काही झालेच नाही असा आव आणून पुन्हा जुन्या गोष्टीत रमून जाणे म्हणजे मैत्री. राड्यानंतर गच्चीवरची मिटींग म्हणजे मैत्री.

टपरीवरचा वाटून घेतलेला कटींग चहा म्हणजे मैत्री. मैत्री म्हणजे जगासाठी अदृश्य पण दोघांच्याही मनात ठळक असलेलं खोल नातं. जिथे देणंही हक्काचं असतं अन घेणंही हक्काचं असतं, ते नातं म्हणजे मैत्री. समोरच्याच्या मनाची काळजी स्वतःपेक्षा जास्त घेणे याची जाणीव असणे म्हणजे मैत्री.

ही मैत्री कुठे सापडते? आयुष्याच्या टप्प्यावर अशी मैत्री कुठेही सापडू शकते. कधी आई-वडिलांत, कधी मुलांत, कधी बायकोत, कधी नवऱ्यात तर कधी अनोळखी माणसांत. तुमचंही आयुष्य अश्याच मित्र मैत्रिणींनी भरलेले असू दे.

हा सर्व अनुभव आता स्पष्टपणे आश्रमात नसताना जाणवू लागला, आणि मन खिन्न होवू लागलं, किती छान ते भारावलेलं जीवन होते, कशाचही टेन्शन मनावर नव्हते, कोणतीही कमिटमेंट नव्हती आणि कोणताही अहंपणाही नव्हता, होती ती फक्त आणि फक्त मैत्री. पूर्वीचे जे मित्र ज्यांच्याबरोबर आपण सहजीवन व्यतीत केले ते सर्वजण आपापल्या कुटुंबासोबत दूर - दूर असून केवळ आजच्या मोबाईलच्या जगात व्हॉटसअॅपच्या द्वारे आपल्याशी कनेक्टेड आहेत. त्या मध्ये कोणताही जीवंतपणा अथवा मायेचा ओलावा जाणवत नसून आहे फक्त व्हर्चुअल मैत्री.

मैत्री दिनाच्या सर्वांना खूप खूप शुभेच्छा!

दि. ३० जुलै २०२२

जागतिक मैत्री दिवस

सुभांरेडकर

## गणानां त्वा गणपतिं हवामहे।

गण म्हणजे समुदाय, लोक, जनता. त्याचा पती म्हणजे अध्यक्ष, नेता, पुढारी. त्याला आम्ही आवाहन करतो.

समुदाय आणि नेता हे शब्द, या कल्पना व या व्यक्ती परस्परावलंबी आहेत. समाज म्हणजे समुदाय, गण, लोक; या समाजाला नेता असेल तर तो मार्गदर्शन करू शकेल. योग्य मार्गदर्शन नसेल तर समाज अधोगतीला जाईल.

ज्या समाजातून स्वयंभू नेते उत्पन्न होऊ शकतात त्यालाच जिवंत समाज म्हणता येईल. नेतृत्वाच्या अभावी समाजात अव्यवस्था, अन्याय, अनास्था यांचे प्राबल्य माजते. ते सहन न होणारी अनेक माणसे असतात; पण ते सर्व मुके राहतात; बहिरे असतात; आंधळे होतात. अन्याय, अनीती, दुराचार, अव्यवस्था पाहून त्यांच्याकडे दुर्लक्ष करतात. तोंड असून वाचा फोडीत नाहीत. चित्रातील तीन माकडे पाहिलीत का? एकाने कान झाकले, दुसऱ्याने डोळे झाकले, तिसऱ्याने तोंड झाकले. अशा माकडासारखे लोक समाजात असतात. म्हणून गणपतीची, नेत्याची, लोकपुढाऱ्याची जरुरी असते.

गण-पती होण्याचा प्रत्येकाने प्रयत्न केला पाहिजे. आपण ज्या समाजात, समूहात, गणात राहतो त्याला मार्गदर्शनाची जरुरी असते. नेत्याची गरज असते. त्या समाजात चाललेला अन्याय कोणीतरी ओरडून सांगायला पाहिजे असतो. अव्यवस्था माजविणारांना तसे करू नका, असे दरडावून सांगणारा पाहिजे असतो. दुराचारी लोकांना पायबंद घालणाराची जरुरी असते. ते जो मनुष्य समाजात करतो तोच गणपती. गणपतीने अन्याय, दुराचार, यांचा प्रतिकार करण्याकरिता नेतृत्व घेतले.

असे जिवंत गणपती, अनेक सजीव गणपती, असंख्य हाडामासांचे गणपती आज प्रत्येक संस्थेत, समाजात, गावात, तालुक्यात, जिल्ह्यात, विभागात, प्रांतात, देशात, जगात पाहिजे आहेत. तरुण पिढीला किती मोठी संधी आहे!

**डॉ. ग. श्री. खैर (ऑगस्ट १९५२)**

## कॉलेज ऑफ इंजिनिअरींग आणि जी. के. पाटे (वाणी) इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, पुणे

**कार्याध्यक्ष : श्री. सुनील रेडेकर**
**संचालक : प्रा. राजेंद्र गो. कडुसकर**

१) निकालावर आधारित शिक्षण (OBE) अभिमुखता कार्यक्रम दि. १० जून २०२२, शुक्रवार रोजी विद्यार्थी आणि शिक्षक कर्मचाऱ्यांसाठी आयोजित करण्यात आला होता. प्राचार्य डॉ. एम. आर. तारंबळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम कॉलेज एनबीए समन्वयक डॉ. श्रीमती यू. एस. ठकार आणि डॉ. एम. पी. भवाळकर यांनी यशस्वीपणे पार पाडले.

२) सकाळ न्यूज पेपर आणि फिनोलेक्स यांनी दि. २४ जून २०२२, शुक्रवार रोजी आरोग्य उपक्रम 'साथ चल' आयोजित केला होता. पुलगेट, महात्मा गांधी बस स्टॉप येथे या उपक्रमात प्राचार्य डॉ. एम. आर. तारंबळे, प्रथम वर्षाचे प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

३) गुरुवार दि. ३० जून २०२२ रोजी प्रथम वर्ष अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी 'Engineering is Awesome' या विषयावर श्री. राघवन कोळी यांचे सकाळी ११.३० ते दुपारी १ या वेळेत महाविद्यालयाच्या सभागृहात प्रेरक अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

***

# महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे

**कार्यवाह : प्रा. राजेंद्र सं. कांबळे**
**प्राचार्य : श्री. व्ही. पी. गावडे**

## कालिदास दिन

गुरुवार, दि. ३०-६-२०२२ रोजी शाळेत कालिदास दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी प्रशालेतील इ. ५वी ते इ. १०वी च्या विद्यार्थ्यांना प्रशालेतील अध्यापिका व्ही. एस्. मोघे यांनी संस्कृत महाकवी कालिदास यांची कथा सांगितली व ज्ञानाचे महत्त्व मनुष्याच्या जीवनात अगाध असल्याचे सांगितले. या प्रसंगी प्रशालेचे प्राचार्य वि. पां. गावडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. प्रशालेचे अध्यापक श्री. युवराज मिरखलकर यांनी फलकलेखन करून फलकावर कालिदासाचे अप्रतिम चित्र काढले.

## पालक-शिक्षक सभा

शै. वर्ष२०२२-२३ या वर्षातील पहिली पालक-शिक्षक सभा सोमवार दि. ११-७-२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती. या सभेचे आयोजन प्रशालेचे प्राचार्य वि. पां. गावडे व पालक-शिक्षक संघ समितीप्रमुख प्रशालेच्या अध्यापिका सौ. एस. डी. जगताप यांनी केले. प्रथम इ. ५वी ते १०वी अशी वर्गवार सभा सर्व वर्गशिक्षकांनी घेतली नंतर एकत्रित सभाही घेण्यात आली. यात शिस्त, स्वच्छता, गुणवत्ता, अभ्यासाबाबत सर्वसमावेशक सूचना, परीक्षा व मूल्यमापन पध्दती, दैनंदिन उपस्थिती, शालेय व संगणक फी तसेच इतर विषयांवर चर्चा करण्यात आली. एकत्रित घेण्यात आलेल्या पालक-शिक्षक सभेत प्रशालेचे अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते आणि प्रशालेचे प्राचार्य वि. पां. गावडे यांनीही वरील विषयांवर व विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने पालकांशी चर्चा केली. या पालक शिक्षक सभेत प्रत्येक वर्गातून पालक प्रतिनिधी नेमून पालक-शिक्षक संघाची स्थापना करण्यात आली व पधाधिकाऱ्यांची निवडही करण्यात आली. सभेचे प्रास्ताविक प्रशालेचे अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी केले. कार्यक्रमाची सांगता प्रशालेच्या अध्यापिका सौ. एस. डी. जगताप यांनी केलेल्या आभार प्रदर्शनाने झाली.

## गुरुपौर्णिमा संपन्न

बुधवार दि. १३-७-२०२२ रोजी गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी प्रशालेचे प्राचार्य वि. पां. गावडे यांच्या हस्ते आद्यगुरू महर्षी व्यास यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर इ. ५वी ते १०वी अशी वर्गवार गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. या प्रसंगी विद्यार्थ्यांना सर्व वर्गशिक्षकांनी गुरुपौर्णिमेचे महत्त्व सांगितले. गुरुपौर्णिमेनिमित्त सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना पेन भेट देण्यात आले.

## मुलांचे हक्क आणि कायदेविषयक जनजागृती

बुधवार दि. २०-७-२०२२ रोजी शाळेत कायदेविषयक जनजागृती शिबिराचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचे आयोजन प्रशालेचे प्राचार्य वि. पां. गावडे यांनी केले. हा कार्यक्रम जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे आणि कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे यांचेमार्फत प्रशालेतील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला. या प्रसंगी बालकांविषयी अत्याचार, मुलांचे मुलभूत हक्क आणि शिक्षणाचा अधिकार, बेटी बचाव, बेटी पढाव या विषयांवर प्रशालेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व न्यायाधिश श्री. एम. डी. कश्यप, न्यायाधिश श्री. चंद्रशेखर पाटील, न्यायाधिश श्री. गजानन कुलकर्णी, ॲड घनश्याम खलाटे यांनी या प्रसंगी प्रशालेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲडव्होकेट नंदिनी शहासने, विश्वस्त, कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता प्रशालेचे अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी केलेल्या आभार प्रदर्शनाने झाली.

***

# मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

**कार्यवाह : प्रा. राजेंद्र कांबळे**
**प्राचार्या : सौ. मीना राणे**
**हेडमिस्ट्रेस : सौ. अनुपमा गुजराथी**

## पूर्व प्राथमिक विभाग

**वृक्षारोपण -** शुक्रवार दि.१ जुलै २०२२ रोजी मुक्तांगण शाळेच्या पूर्व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी झाडे लावली. लावलेल्या झाडांची योग्य काळजी घेऊन त्यांचे योग्य संगोपन कसे केले पाहिजे याची विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

**पालखी सोहळा -**

शुक्रवार दि.८ जुलै २०२२ रोजी मुक्तांगण शाळेच्या पूर्व प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांना ३९; पंढरीचाविठूराया व वारी ३९;यांचा अनुभव यावा याकरिता सदर दिंडीचे आयोजन करण्यात आले. यामध्ये छोट्या व मोठ्या गटातीलबालचमू सहभागी झाले होते. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अनुपमा गुजराथी व पर्यवेक्षिका सौ. रेखा बाली या दोघींनी पालखीचे स्वागत व पूजन केले. यावेळी विद्यार्थ्यांना खाऊ वाटण्यात आला.

**श्लोक पठण स्पर्धा -**

मुक्तांगण शाळेच्या पूर्व प्राथमिक विभागात शुक्रवार दि. १५ जुलै २०२२ रोजी ज्युनिअर के .जी. व सोमवार दि. १८ जुलै २०२२ रोजी सिनियर के. जी. च्या विद्यार्थ्यांसाठी मनाचे श्लोक पठण स्पर्धा आयोजित केली होती.

स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे -

ज्युनिअर के.जी. -

प्रथम क्रमांक- १. शिवांश शिंदे २. स्वरा मोरे

द्वितीय क्रमांक - १. वेदांती काळे २. श्लोक विश्रे

सिनियर के.जी.-

प्रथम क्रमांक- १. स्वरा भावे

द्वितीय क्रमांक- १.प्रियदर्शनी काळे २. प्रजित कुलकर्णी

वरील स्पर्धेस ज्युनिअर के.जी. साठी सौ. पल्लवी देशपांडे व सौ. मधुरा महाडिक तसेच सिनिअर के.जी. साठी सौ. स्वाती महाजन व सौ. क्षमा हर्डीकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

## प्राथमिक विभाग

**आंतरराष्ट्रीय योग दिन**

मंगळवार दि. २१ जून २०२२ रोजी शाळेत आंतरराष्ट्रिय योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी श्री. विशाल गोरे, श्री. बलराज शोभणे व श्री. शुभम नाईक यांनी विद्यार्थ्यांकडून योगासने तसेच प्राणायाम करून घेतले. सर्व शिक्षकांनी वर्गात विद्यार्थ्यांकडून योगासने करून घेतली. शिक्षिका सौ. सोनाली तांगडे यांनी विद्यार्थ्यांना योग दिनाची माहिती दिली. यावेळी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. अनुपमा गुजराथी व पर्यवेक्षिका सौ. रेखा बाली याही उपस्थित होत्या.

**वृक्षदिन -**

शुक्रवार दि. १ जुलै २०२२ रोजी मुक्तांगण शाळेच्या प्राथमिक विभागात वृक्षदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यातआला. या दिनानिमित्त इयत्ता १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांना प्रत्येक इयत्तेमधून एक घोषवाक्य व औषधी रोप आणण्यास सांगितले होते. सौ. स्नेहल गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना वृक्षदिनाचे महत्व पटवून दिले. पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. अनुपमा गुजराथी व पर्यवेक्षिका सौ. रेखा बाली तसेच शिक्षक प्रतिनिधी सौ. शिल्पा पाटील यांच्याउपस्थितीत वृक्षदिनानिमित्त शाळेच्या आवारात वृक्षदिंडी काढण्यात आली. विद्यार्थ्यांनी आणलेल्या रोपांचे शाळेच्या आवारात वृक्षारोपणही करण्यात आले.

**पालक शिक्षक सभा -**

मंगळवार दि. ५ जुलै २०२२ रोजी २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षाची पालक शिक्षक सभा घेण्यातआली. या

सभेसाठी इयत्ता १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते. या सभेसाठी प्रत्येक इयत्तेकरता ठराविक वेळ देण्यात आली होती. इयत्ता १ ली व २ री ८ ते ९ या वेळेत तर इयत्ता ३ री व ४ थी १० ते ११ या वेळेत सभा घेण्यात आली.या सभेत वर्गशिक्षिका व इतर विषयांचे शिक्षक यांनी स्वत:च्या विषयाची ओळख करून दिली व नंतर आपापल्या विषयाबद्दलच्या महत्त्वाच्या सूचना दिल्या. यावेळी पालकांच्या सर्व शंकांचे निरसनही करण्यात आले. याच सभेत सर्वानुमते प्रत्येक इयत्तेमधून पालक प्रतिनिधींची निवड करण्यात आली. या सभेत पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ.अनुपमा गुजराथी व पर्यवेक्षिका सौ. रेखा बाली यांनी उपस्थित पालकांशी संवाद साधला व महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा केली.

**गुरुपौर्णिमा -**

बुधवार दि. १३ जुलै २०२२ रोजी मुक्तांगण शाळेच्या प्राथमिक विभागात गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शिक्षिका सौ. वैशाली डबीर यांनी विद्यार्थ्यांना गुरुपौर्णिमेचे महत्त्व सांगितले. याच दिनाचे औचित्यसाधून सर्व शिक्षकांना श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.

**पालक शिक्षक सभा व माता पालक सभा -**

शनिवार दि. १६ जुलै २०२२ रोजी मुक्तांगण शाळेच्या प्राथमिक विभागाची पहिलीपालक शिक्षक सभा व माता पालक सभा घेण्यात आली. या सभेत पालक शिक्षक सभेचे अध्यक्ष व माता पालक सभेचे अध्यक्ष यांची निवड पालक प्रतिनिधीतून करण्यात आली. शाळेच्या पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. अनुपमा गुजराथी व पर्यवेक्षिका सौ. रेखा बाली यांनी उपस्थित पालक प्रतिनिधींशी व माता पालक प्रतिनिधींशी संवाद साधला व महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा केली. यावेळी इयत्ता पहिली ते चौथीच्या वर्गशिक्षिका व इतर विषयांचे शिक्षकही उपस्थित होते.

**इंग्लिश हस्ताक्षर स्पर्धा -**

सोमवार दि. १८ जुलै २०२२ रोजी मुक्तांगण शाळेच्या प्राथमिक विभागात इ. १ ली ते ४ थी च्यावर्गांची इंग्लिश हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत सर्व विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

**माध्यमिक विभाग**

**जागतिक योग दिन**

२१ जून २०२२ रोजी शाळेत जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी शाळेतील माजी विद्यार्थी लेफ्टनंट अजिंक्य गायकवाड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. एन.सी.सी.च्या विद्यार्थ्यांनी सूर्यनमस्कार व योगासनांची प्रात्यक्षिके सादर केली. या कार्यक्रमाला शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. मीना राणे, पर्यवेक्षिका सौ. सायली धाक्रस, सौ. सुप्रिया देशकुलकर्णी उपस्थित होत्या. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन शाळेतील शिक्षिका सौ. अनिता गायगोले व श्रुती गायकवाड यांनी केले.



**जागतिक योग दिन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे माजी विद्यार्थी लेफ्टनंट अजिंक्य गायकवाड मार्गदर्शन करताना**



**जागतिक योग दिन प्रसंगी योग करता विद्यार्थी**

**अभिनंदनीय**

२०२१-२२ वर्षीचा शाळेचा निकाल ९९.७% लागला.
एकूण विद्यार्थी - ३८७, पास झालेले विद्यार्थी - ३८६

**शाळेतील पहिले पाच विद्यार्थी**



कु. तनिष्का शिंदे (१०वी ब) ९९.६%



कु. ऋतुपर्ण रानडे (१०वी अ) ९८.८%



कु. ऋचा रानडे (१०वी ब) ९८.४%



कु. श्रिया तपस्वी (१०वी ब) ९८.२%



कु. श्रेया बुचडे (१०वी क) ९७.४%

दि. ४ जुलै २०२२ रोजी या सर्व विद्यार्थ्यांसाठी शाळेने त्यांच्या पालकांसोबत कौतुक समारंभ आयोजित केला होता. या वेळेस इतर विद्यार्थ्यांनाही गुणपत्रिका वाटप करण्यात आले.

**पालक शिक्षक सभा -**

दि. ५ जुलै २०२२ रोजी मुक्तांगण इंग्लिश स्कूलमध्ये माध्यमिक विभागाची पालक सभा आयोजित करण्यात आली होती. इयत्ता ५ वी ते इयत्ता १० वीच्या पालकांसाठी ही सभा आयोजिली होती.यात वर्गशिक्षिकांनी मार्गदर्शन केले. पाठ्यक्रम व परीक्षांचे स्वरूप यावर सविस्तर माहिती दिली गेली. पालकांचे सगळ्या शंकांचे निरसन केले .सर्व पालकांनी या सभांना खूप चांगला प्रतिसाद दिला. ही सभा आयोजित करण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.मीना राणे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**गुरुपौर्णिमा -**

कुलगुरू वि. ग. तथा दादासाहेब केतकर सभागृहात दि.१३ जुलै २०२२ रोजी गुरुपौर्णिमेनिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. गुरुपौर्णिमेनिमित्त डॉ.सुप्रिया अत्रे या प्रमुख पाहुण्या म्हणून लाभल्या होत्या. यावेळी संस्थेचेसंचालक श्री. रमेश कुलकर्णी उपस्थित होते. दहावीचे विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मुक्तांगण इंग्लिश स्कूलच्याविद्यार्थी गटाकडून गायलेल्या गणेश वंदनेने झाली.शाळेच्या पर्यवेक्षिका सौ. सुप्रिया देशकुलकर्णी यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. संस्थेचे संचालक श्री. रमेश कुलकर्णी यांच्याकडून प्रमुख पाहुण्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.इयत्ता १०वी, इयत्ता १२वी परीक्षा तसेच इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी शिष्यवृत्ती या परीक्षेत भरघोस यश प्राप्त केलेल्या गुणवंतविद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले.यावेळी डॉ. सुप्रिया अत्रे यांच्याकडून सर्व विभागातील शिक्षक प्रतिनिधींचा सत्कार करण्यात आला. तसेच विद्यार्थीप्रतिनिधींकडून सर्व शिक्षकांना श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. इयत्ता दहावी अ मधील विद्यार्थी सोहम काणे आणि विद्यार्थिनी आर्या दांडेकर यांनी गुरुपौर्णिमेचे महत्त्व सांगितले. डॉ. सुप्रिया अत्रे यांनी गुरूंची महती सांगताना वेगवेगळी उदाहरणे दिली. तसेच संत महात्म्य सांगताना वेगवेगळे दाखले देऊन उपस्थितांना उत्तम मार्गदर्शन केले.

**पालक शिक्षक सभा व माता पालक सभा -**

शनिवार दि.१६ जुलै २०२२ रोजी मुक्तांगण शाळेच्या माध्यमिक विभागाची पहिलीपालक शिक्षक सभा व माता पालक सभा घेण्यात आली. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.मीना राणे यांनी उपस्थित पालकप्रतिनिधींशी संवाद साधला व महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा केली. यावेळी इयत्ता पाचवी ते इयत्ता बारावीच्या वर्गशिक्षिका वप्रत्येक वर्गाचे पालक प्रतिनिधी उपस्थित होते.

**शिष्यवृत्ती परीक्षा निकाल -**

दि. ७ जानेवारी २०२२ रोजी २०२०-२१मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षांचानिकाल जाहीर झाला.पूर्व उच्च प्राथमिक परीक्षेस प्रविष्ट झालेल्या ५५ विद्यार्थ्यांपैकी एकूण २७

विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले. त्यापैकी पुढील दोन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली.


कु. मृदुला भुजबळ
७६.६६%


कु. सई जाधव
७०.८०%

पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेस प्रविष्ट झालेल्या ३७ विद्यार्थ्यांपैकी २१ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले . त्यापैकी पुढील तीन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली.


कु. अमोघ बाकरे
७५.८३%


कु. आर्या देसाई
६३.७५%


कु. आयुषा वाईकर
६३.७५%

**अभिनंदनीय**

दि. ३ जुलै २०२२ रोजी पुणे येथे घेण्यात आलेल्या बी. सी. एम. ए. राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत इयत्ता आठवी क मधील विद्यार्थिनी कु. श्रेया बळवंत कदू हिला कटा या कराटे क्रीडा प्रकारात सुवर्ण तर किक प्रकारात कांस्यपदक मिळाले.

तामिळनाडू ऑल इंडिया सिलंबम फेडरेशन (ए. आय. एस. एफ.) तर्फे तामिळनाडू (कन्याकुमारी)येथे घेण्यात आलेल्या १८ व्या नॅशनल चॅम्पियनशिपमध्ये इयत्ता सातवी क मधील विद्यार्थी मल्हार संजय केळकर याने तिसरा क्रमांक पटकावून कांस्यपदक मिळविले.

दि.१३ जुलै २०२२ रोजी नेहरू स्टेडियम पुणे येथे घेण्यात आलेल्या क्रिकेट स्पर्धेत इयत्ता सातवी ब मधील विद्यार्थी सोहम मनोज धोंगडी याने पारितोषिक मिळविले.

तायक्वांदो बेल्ट परीक्षेत इयत्ता सातवी ब मधील विद्यार्थी आयुष महेंद्र गायकवाड व सहर्ष निलेश घोडनदीकर यांनी अनुक्रमे ए ग्रेड व ए + ग्रेड मिळवित ऑरेंज बेल्ट , प्रमाणपत्र आणि यलो बेल्ट व प्रमाणपत्र मिळविले.

पुणे जिल्हा ॲमेचर ॲथलेटिक्स असोसिएशनने जिल्हास्तरीय ॲथलेटिक चॅम्पियनशिप २२ ते २४ जुलै २०२२ रोजी संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल येथे आयोजित केली होती.यात सोळा वर्षाखालील गटात इयत्ता नववी तुकडी इ मधील विद्यार्थिनी काव्या कुलकर्णी हिने थाळी फेक या क्रीडा प्रकारात रौप्य पदक मिळविले व ती राज्यस्तरीय स्पर्धेस पात्र ठरली. तसेच गोळाफेक या क्रीडा प्रकारात देखील तिने दुसरे सुवर्णपदक मिळविले.

**उच्च माध्यमिक विभाग**

महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा इयत्ता १२ वी चा निकाल ८/६/२२ रोजी जाहीर करण्यात आला. यात मुक्तांगण कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भरघोस यश संपादन केले.आपल्या महाविद्यालयाचा निकाल ९७.९६% लागला. या परीक्षेस २९५ इतके विद्यार्थी बसले होते व त्यापैकी २८९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विशेष श्रेणीत २०विद्यार्थी,प्रथम श्रेणीत १०६ विद्यार्थी, व्दितीय श्रेणीत १४६ विद्यार्थी व तृतीय श्रेणीत १७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

**या परीक्षेत १) जगताप अनुराग विश्वनाथ हा विद्यार्थी ९१.५% गुण मिळवून प्रथम आला.तर २) बहाडकर सुस्मित अमोल हा विद्यार्थी ८७.८३% गुण मिळवून द्वितीय तर ३) भामरे साक्षी राजेश ही विद्यार्थिनी ८७% गुण मिळवून तिसरी आली. या यशाबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन.**

**पालक-शिक्षक सभा**

मुक्तांगण कनिष्ठ महाविद्यालयात दिनांक ९/७/२२ रोजी इयत्ता १२ वी ची पालक-शिक्षक सभा आयोजित करण्यात आली होती. इयत्ता १२ वीच्या वर्गशिक्षिकांनी पालकांना महाविद्यालयाचे दैनंदिन कामकाज व विद्यार्थ्यांनी पाळावयाचे नियम तसेच परीक्षा पध्दती याबाबत विस्ताराने मार्गदर्शन केले. तसेच प्रत्येक तुकडीकरीता एक याप्रमाणे चार पालक प्रतिनिधींची नेमणूक करण्यात आली. ही सभा आयोजित करण्यासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या सौ.मीना राणे व महाविद्यालयाच्या प्रमुख डॉ. सौ.स्वातीनिकम यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

***

# अभियांत्रिकी व धामणकर व्यवस्थापन महाविद्यालय, म्हसरूळ, नाशिक


**संचालक : संजय नि. गुंजाळ**
**प्राचार्य : डॉ. अमोल रासने**

### पीव्हीजी अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयाचा १२वा वर्धापन दिन व प्रशासकीय कार्यालयाचा उद्‌घाटन समारंभ

पुणे विद्यार्थी गृह अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यायाच्या १२व्या वर्धापन दिनानिमित्त महाविद्यालयाच्या नूतन प्रशासकीय कार्यालयाचे उद्‌घाटन दि. १३ जुलै रोजी गुरुपौर्णिमेच्या शुभ मुहूर्तावर प्रमुख पाहुणे ग्रुप कॅप्टन श्री. राजीव केतकर व सौ. नंदिनी केतकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संस्थेच्या हितचिंतक श्रीमती गंगुताई धामणकर तसेच संस्थेच्या नियामक मंडळाचे उपाध्यक्ष श्री. श्रीधर पाटणकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. आर. रासने यांनी केले. त्यानंतर म्हसरूळ शाखेचे संचालक श्री. एस. एन. गुंजाळ यांनी म्हसरूळ शाखेची आजवरची प्रगती व त्यासाठी कर्मचारी व संस्थेतील पदाधिकाऱ्यांनी घेतलेले परिश्रम याबद्दल त्यांचे कौतुक केले. डॉ. एस. जी. वाकचौरे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. **पुणे विद्यार्थी गृहाशी आपले जिव्हाळ्याचे नातेसंबंध आहेत तसेच आजोबा कै. दादासाहेब केतकर यांनी दिलेला सामाजिक कार्याचा वारसा यापुढेही संस्थेशी ऋणानुबंध ठेवत जपला जाईल अशी ग्वाही प्रमुख पाहुणे श्री. राजीव केतकर यांनी आपल्या भाषणातून दिली.** श्री. श्रीधर पाटणकर यांनी संस्थेच्या गेल्या शतकात झालेला कायापालट उल्लेखनीय आहे असे सांगितले. संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. सुनील रेडेकर यांनी संस्थेचा आजवरचा विकास हा दिवसेंदिवस संस्थेतील पदाधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नपूर्वक मेहनतीने उंचावत आहे असे आपल्या भाषणात नमूद केले. ह्या कार्यक्रमास पुणे विद्यार्थी गृहाचे कार्याध्यक्ष श्री. सुनील रेडेकर, उपकार्याध्यक्ष श्री. सुभाष जिर्गे, कुलसचिव श्री. अमोल जोशी, संचालक श्री. दिनेश मिसाळ, श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, श्री. राजेंद्र कडूसकर व श्री. कृष्णाजी कुलकर्णी तसेच संस्थेचे माजी कार्याध्यक्ष श्री. कृष्णाजी शिरकांडे आणि महाविद्यालयाचे सर्व सेवक उपस्थित होते. या प्रसंगी नूतन प्रशासकीय कार्यालयाच्या उभारणीस हातभार लावणाऱ्या विविध व्यावसायिकांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. मनोज भालेराव यांनी सर्व मान्यवरांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. वैशाली गाजरे यांनी केले.

***

## निधन वार्ता :



कै. अनिल घाणेकर

● संस्थेचे देणगीदार श्री. अनिल गोविंद घाणेकर यांचे दि. २८ जुलै २०२२ रोजी वयाच्या ७४ व्या वर्षी दुःखद निधन झाले.

● पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन संस्थेचे ज्येष्ठ लेखक श्री. द्वा. वा. केळकर यांच्या पत्नी श्रीमती गीता द्वा. केळकर यांचे दि. २२ जुलै २०२२ रोजी वयाच्या ९२व्या वर्षी दुःखद निधन झाले.

**ईश्वर त्यांचे आत्म्यास सद्‌गती देवो !**

**

# माजी विद्यार्थी महामंडळ घाटकोपर, मुंबई

**अध्यक्ष – प्रा. कृ. ना. शिरकांडे**
**उपाध्यक्ष – प्रा. श्रीधर अ. पाटणकर**
**महासचिव – श्री. तुकाराम रं. दौंडकर**

## सातवे माजी विद्यार्थी महासंमेलन अहवाल.

हे महासंमेलन दि. १२ मे २०२२ रोजी सकाळी ९.०० वा. पासून संस्थेच्या पुणे मुख्यालयातील श्रीराम मंदीरात आयोजित करण्यात आले होते. महासम्मेलनाला ६५ माजी विद्यार्थी उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्रा. कृष्णाजी ना. शिरकांडे होते. सकाळी ९ वाजल्यापासून अध्यक्ष्यांनी सर्व माजी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. उपस्थित सर्वांना चहापान व नाश्ता देण्यात आला. संस्थेचे जेष्ठ माजी विद्यार्थी श्री. रमेशचंद्र गोविंद कुलकर्णी यांच्या ''पत्रसंवाद भाग-१, आणि भाग २- माझी लेखन वाचन श्रवण संस्कृती'' पुस्तकाचे प्रकाशन संस्था पदाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले.

''माझ्या जीवनात संस्थेचे महत्व'' या विषयावर चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले होते. चर्चा सत्राच्या अध्यक्षस्थांनी कार्याध्यक्ष श्री. सुनिल रेडेकर होते. डॉ. एकनाथ कुलकर्णी, डॉ. बा. गो. कुलकर्णी, श्री. बाळासाहेब आसवले, डॉ. चंद्रशेखर पुरंदरे, श्री. संदेश शेठ, श्री. किरण इनामदार, श्री. राजेंद्र नलगे, श्री. गोरख हिंगे, श्री. शिवाजी पाटील, श्री. कृष्णाजी कुलकर्णी यांनी आपले विचार व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषण कार्याध्यक्ष श्री. सुनिल रेडेकर यांनी १९७७ पासून आतापर्यंत ४५ वर्षाचा जीवन प्रवास संस्थेत झाला. त्याबद्दल ऋणी आहोत. सुसंगतीने घडत गेलो. माझे मुर्तीमंत आयुष्य घडविण्याचे कार्य संस्थेने केले त्यामुळे माझ्या जीवनात संस्थेचे महत्व अनन्य साधारण आहे. अशा भावना व्यक्त केल्या. यानंतर मुंबई विभागात घाटकोपर व नेरुळ शाखातील अध्यापकांसाठी वक्तृत्व स्पर्धा व निबंध स्पर्धा पारितोषिक विजेते अध्यापकांना संस्था पदाधिकारांच्या हस्ते धनादेश व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.तसेच आदर्श शिक्षक, आदर्श कार्यकर्ता पुरस्कार व आदर्श शिक्षणतज्ज्ञ मागील तीन वर्षाचे पुरस्कार वितरण संस्था व महामंडळ पदाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी १) अध्यापक वक्तृत्व स्पर्धा २०२२ २) अध्यापक व माजी विद्यार्थी निबंध स्पर्धा २०२२ घेण्यात आल्या. पारितोषिक विजेत्या अध्यापकांना संस्था व महामंडळ उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक रक्कम धनादेशद्वारे व प्रमाणपत्र देण्यात आले.

### आदर्श शिक्षक पुरस्कार :-

आदर्श शिक्षक पुरस्कार निवड :- आदर्श शिक्षक पुरस्कार निवडीसाठी महामंडळामध्ये अध्यक्ष श्री. कृष्णाजी ना. शिरकांडे, उपाध्यक्ष प्रा. श्री. अ. पाटणकर, महासचिव श्री. तु. रं. दौंडकर, संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. सुनिल रेडेकर व कार्यवाह प्रा. राजेंद्र कांबळे यांच्या निवड समितीने पुढील पुरस्कारासाठी नावे सुचविण्यात आली. मागील तीन वर्षाचे पुरस्कार देण्याचे ठरविण्यात आले.

### कुलगुरु दादासाहेब केतकर आदर्श शिक्षक पुरस्कार (मराठी माध्यम)

१.(२०२०) श्री. शिवाजी रामा माळी, मुख्याध्यापक, विद्याभवन हाय. व ज्यु. कॉलेज, नेरुळ.

२.(२०२१) श्री. ईश्वर चुनीलाल पवार, निदेशक, तांत्रिक विभाग, महाराष्ट्र विद्यालय अॅण्ड ज्यु. कॉलेज, पुणे.

३.(२०२२) श्रीमती सुनंदा मोतीलाल ठाकरे, सहा. शिक्षिका,काकासाहेब देशमुख विद्यालय,पंचवटी,नाशिक

### डॉ. अण्णासाहेब खैर आदर्श शिक्षक पुरस्कार (इंग्रजी माध्यम)

१.(सन २०२०) श्रीमती शुभांगी मच्छिंद्र जाधव, मुख्याध्यापिका, विद्याभवन प्राथ. इंग्रजी, घाटकोपर

२.(२०२१) श्रीमती श्रीजा बाबुराज नायर, प्र. मुख्याध्यापिका, विद्याभवन, माध्य. इंग्रजी, नेरुळ.

३. (२०२२) श्रीमती मीना शैलेश राणे, प्र. मुख्याध्यापिका मुक्तांगण माध्य. इंग्रजी अॅण्ड ज्यु. कॉलेज, पुणे ९.

**डॉ. प. भ. कुलकर्णी - आदर्श तांत्रिक शिक्षण (प्रा. राजेंद्र सं. कांबळे पुरस्कृत)**

१.(२०२०) श्री. परमेश्वर विश्वनाथ शिंदे, प्र. प्राचार्य महाराष्ट्र इंस्टिट्युट ऑफ प्रिंटींग टेक्नॉलॉजी, पुणे.

२. (२०२१) प्रो. प्रीती राजेंद्र खत्री, सहाय्यक प्राध्यापक, इलेक्ट्रीकल इंजि., रेक्टर मुलींचे वसतिगृह, P.V.G. COET & GKPW Inst. Pune.

३. (२०२२) प्रो. सुहास विलास धारणे, सहा. प्राध्यापक, सिव्हिल इंजि., Pune Vidyarthi Griha's College of Engineering & S. S. Dhamankar Institute of Management, Nashik.

**डॉ. काकासाहेब देवधर- आदर्श महाविद्यालय अध्यापक पुरस्कार**

१. (२०२०) डॉ. संजयकुमार मोतीलाल गायकवाड, प्राचार्य P.V.G. कॉलेज ऑफ सायन्स, पर्वती, पुणे ९.

२.(२०२१) प्रा. अजयकुमार पाठक, प्र. प्राचार्य, P.V.G. कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड टेक्नॉ., घाटकोपर.

३. (२०२२) प्रो. हेमांगिनी एम. पाटील, सहाय्यक प्राध्यापक, इंग्रजी विभाग PVG Shriram Sadashiv Dhamankar College of Commerce and Science, Nashik.

**ज. शां. वैद्य आदर्श कार्यकर्ता पुरस्कार**

१.(२०२०) श्री. मधुकर अनंत जोशी, मुंबई.

२.(२०२१) डॉ. एकनाथ गणेश कुलकर्णी, नाशिक.

३.(२०२२) श्री. प्रभुणे रविंद्र रामचंद्र, पुणे.

**डॉ.शं.पां. किंजवडेकर आदर्श शिक्षणतज्ज्ञ पुरस्कार**

१. (२०२१) प्राचार्य श्रीधर अनंत पाटणकर, पुणे.

२. (२०२२) प्राचार्य कृष्णाजी नारायण शिरकांडे, मुंबई.

पुरस्कार प्राप्त अध्यापकांना व कार्यकर्त्यांना संस्था व महामंडळ पदाधिकाऱ्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, शाल व बुके देऊन कौतुक करण्यात आले.

**वार्षिक सर्वसाधारण सभा :-**

महामंडळाची ७ वी वार्षिक सर्व साधारण सभा गुरुवार दि. १२ मे २०२२ रोजी दु. ०३.०० वा पुणे विद्यार्थी गृह १७८६ सदाशिव पेठ, पुणे येथे श्रीराम मंदीर सभागृहात झाली. सभेला ६५ माजी विद्यार्थी उपस्थित होते. अध्यक्ष स्थानी प्राचार्य कृ . ना. शिरकांडे होते. श्री. दिनेश पि. मिसाळ यांनी श्री. तुकाराम रं. दौंडकर, महासचिव यांची प्रकृती अस्वस्थ असल्यामुळे येवू शकले नसल्याचे सांगितले. तसेच उपाध्यक्ष प्रा. श्री. अ. पाटणकर हे ही येवू शकणार नसल्याचे कळविले आहे, असे सांगितले. सर्वांचे स्वागत केले व दि. ०४.०५.२०२२ ची सभा सूचना दाखविली गेली. गेल्या तीन वर्षात निधन पावलेल्या सुमारे ११० व्यक्तीच्या निधनाबद्दल त्यांनी शोक प्रस्ताव मांडला व सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध राहून दिवंगताना श्रध्दांजली वाहिली.

मागील वर्षाचे इतिवृत्त वाचन व मंजुरी :-श्री. दिनेश मिसाळ यांनी दि. १२ मे २०१९ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचले. ते सर्वांनुमते मंजुर करण्यात आले.

महामंडळाचा सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ या त्रैवार्षिक वर्षाचा अहवाल वाचन व मंजूरी देण्यात आली.

**सहावे माजी विद्यार्थी सम्मेलन अहवाल व आठवे माजी विद्यार्थी सम्मेलन :-**

दि. १२ मे २०१९ रोजी दु. ४.०० वा संस्थेच्या पुणे मुख्यालयातील श्रीराम मंदीर सभागृहात झाले. सम्मेलनाला ३१ माजी विद्यार्थी उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्रा. कृ. ना. शिरकांडे होते.

आर्थिक वर्ष २०२२-२३ करीता लेखा परीक्षक नेमणूक करणे :-श्री. गडकरी आणि कंपनी यांची लेखा परीक्षक म्हणून नेमणूक करण्यात आली.

**महामंडळ त्रैवार्षिक निवडणूक :-(मे २०२२ ते मे २०२५)**

पुणे विद्यार्थी गृह, माजी विद्यार्थी महामंडळाची त्रैवार्षिक मे २०२२ ते मे २०२५ या कालावधीची निवडणूक, निवडणूक अधिकारी म्हणून श्री. सुभाष म. जिर्गे यांनी यशस्वीपणे जबाबदारी पार पाडली. प्रत्येक पदानुसार एकाच उमेदवाराचा अर्ज विहित वेळेत आल्यामुळे

निवडणूक बिनविरोध झाल्याचे सांगून पुढील उमेदवार बिनविरोध निवडून आल्याचे जाहिर केले. अध्यक्ष - प्रा. कृ. ना. शिरकांडे, उपाध्यक्ष - प्रा. श्रीधर पाटणकर, डॉ. एकनाथ कुलकर्णी, डॉ. चंद्रशेखर पुरंदरे, श्री. बाळासाहेब आसवले, महासचिव - श्री. तुकाराम दौंडकर, कोषपाल - श्री. म. अ. जोशी, सहसचिव - श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, श्री. सुभाष म. जिर्गे, श्री. विजय बाविस्कर, श्री. किरण इनामदार, श्री. रामदास आसवले.

**नवीन आश्रयदाता सभासद :-**

पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी महामंडळाचे पुढील ९ माजी विद्यार्थी आश्रयदाता सभासद वर्गणी रु. ५०००/- देवून आश्रयदाता सभासद झाले. सर्वांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. सर्वश्री रामदास आसवले, रविंद्र प्रभुणे, नारायण देशमुख, आनंद कुलकर्णी, अनिल चितळे, अरविंद सोनटक्के, रमेश कुलकर्णी, देवराम महाजन, साईनाथ काळे.

***

# गुरूवर्य अण्णासाहेब खैर पारितोषिकासाठी आवेदनपत्र

पुणे विद्यार्थी गृह, माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई विभाग, (मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग) या संस्थेकडून शालांत, उच्चमाध्यमिक, पदवी, पदविका आणि पदव्युत्तर परीक्षेत किमान ५५% किंवा ज्या परीक्षेत फक्त श्रेणी असेल तेथे किमान द्वितीय श्रेणी मिळवून उत्तीर्ण झालेला पुणे विद्यार्थी गृहाच्या कोणत्याही शाखेतील माजी विद्यार्थी, विद्यार्थिनीकडून अथवा माजी विद्यार्थी मंडळ,मुंबई विभाग सभासदांच्या मुलां/ मुलींकडून गुरूवर्य अण्णासाहेब खैर पारितोषिकासाठी आवेदन पत्रे मागविण्यात येत आहेत. आवेदनपत्रे विद्याभवन, घाटकोपर (पूर्व), मुंबई-४०० ०७७ व विद्याभवन, नेरुळ, नवी मुंबई-४००७०६ येथे मिळू शकतील.

**आवेदनपत्रे पूर्णपणे भरून आवश्यक कागदपत्रांच्या प्रमाणित प्रतीसह दि. ३१ ऑगस्ट २०२२ पर्यंत पुणे विद्यार्थी गृह, माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई विभाग द्वारा - विद्याभवन, घाटकोपर (पूर्व), मुंबई - ४०००७७ या पत्त्यावर मिळतील अशा रीतीने पाठवावीत.**

पारितोषिके पुढीलप्रमाणे आहेत :-

१) शालांत परीक्षा - इतर शाळांसाठी ०२

२) उच्च माध्यमिक परीक्षा (कला / विज्ञान / वाणिज्य) - इतर महाविद्यालयांसाठी ०२

३) पदवी, पदविका - कला, विज्ञान, वैद्यकीय, अभियांत्रिकी, शेती प्रत्येक शाखेसाठी ०२

४) पदव्युत्तर परीक्षा - कला, विज्ञान, वैद्यकीय, अभियांत्रिकी, शेती प्रत्येक शाखेसाठी ०३

पारितोषिक वितरण समारंभ रविवार दि. १७ सप्टेंबर २०२२ रोजी दुपारी ०३.०० वाजता विद्याभवन, घाटकोपर (पूर्व) येथे प्रमुख पाहुणे ज्येष्ठ माजी विद्यार्थी श्री. रमेशचंद्र गोविंद कुलकर्णी यांच्या हस्ते होणार आहे.

यावेळी मंडळातर्फे श्री. भागवत, श्री. गरगटे, डॉ. किंजवडेकर, प्रा. ना. गो. जोशी, ॲड. मा. पां. फणसे व श्री.म. कों. वाघ यांनी ठेवलेल्या पारितोषिकांचेही वितरण होईल.

सर्व माजी विद्यार्थ्यांनी व सभासदांनी या समारंभास सहकुटुंब अवश्य उपस्थित रहावे ही विनंती. संपर्कासाठी मो.नं.-९८१९४४४२०८ श्री.तुकाराम रं.दौंडकर (मुंबई)

अध्यक्ष सचिव

पुणे विद्यार्थी गृह, माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई विभाग

***

# विद्याभवन प्राथमिक मराठी शाळा

## नेरूळ,नवी मुंबई शाखा

**संचालक : श्री. दिनेश मिसाळ**
**संचालक : श्री. राजेंद्र बोऱ्हाडे**
**मुख्याध्यापिका : सौ. सुवर्णा दिनेश मिसाळ**

**योगदिन :-**

दि. २१ जून २०२२ रोजी पुणे विद्यार्थी गृह विद्याभवन, नेरुळ येथील सभागृहामध्ये ८ वा आंतरराष्ट्रीय योगदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी संस्थेचे संचालक श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा मिसाळ, सहा. शिक्षक श्री. अविनाश कुलकर्णी, श्री. जगन्नाथ कोळी, सर्व शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्री अविनाश कुलकर्णी यांनी संस्थेचे संचालक श्री दिनेश मिसाळ यांचे शाल व श्रीफळ देवून स्वागत केले. योगादिनानिमित्त संस्थेचे संचालक श्री दिनेश मिसाळ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, २१ जून हा वर्षातील सर्वात मोठा दिवस असल्याने या दिवसाला विशेष महत्व आहे. २१ जून हा दिवस सर्व जगभरात योगदिन म्हणून साजरा केला जातो. योगसाधनेची व्यवस्थित मांडणी करणारा पहिला ग्रंथ म्हणजे ख्रि. पू. २०० मधील पंतजलींचा "योगसूत्र" हा अभिजात प्रबंध आहे. तसेच योगाची अष्टांगे सांगून त्याची माहिती सांगितली, विद्यार्थ्यांनी दररोज योगासने करावीत, योगासनांनी शरीराला लवचिकता व शिस्तबद्धता लाभते यानंतर संस्थेचे संचालक श्री. दिनेश मिसाळ यांनी सूर्यनमस्कार, वृक्षासन, सर्वांगासन, चक्रासन व भुजंगासन यांसारखी ४० आसने, चार प्राणायम पद्धती तसेच योग प्रात्याक्षिके विद्यार्थ्यांसोबत केली. काही निवडक विद्यार्थ्यांनी अवघड आसनेही स्वतंत्रपणे करुन दाखवली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन श्रीमती नूतन गवांदे यांनी केले.

**नेहरु तारांगण शैक्षणिक सहल :-**

दि. २२ जून २०२२ रोजी दैनिक महाराष्ट्र टाइम्सच्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून विद्याभवन प्राथमिक मराठी विभागातील इ. ६वी व इ. ७ वीच्या ५० विद्यार्थ्यांसाठी नेहरु तारांगण या ठिकाणी शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांसाठी ती एक पर्वणीच होती. नेहरु तारांगणाचे संचालक डॉ. अरविंद परांजपे यांनी विद्यार्थ्यांशी हितगुज साधून अवकाशातील तारांगणाची पूर्ण माहिती सांगितली. अवकाश गृहामध्ये विद्यार्थी व शिक्षकांनी ताऱ्यांविषयीचा जीवनपट पाहिला. श्री. राठोड यांनी अंतराळाविषयीची माहिती चलपटातून दाखविली. तसेच पत्रकार श्री. नीरज पांडे यांनी विद्यार्थ्यांना व शिक्षकांना खाऊ दिला. तसेच शिक्षकांना पुस्तक भेट दिले.

तारे व अवकाशगंगेविषयी विद्यार्थ्यांना मिळालेली माहिती अत्यंत उपयुक्त व ज्ञानात भर पाडणारी होती.

**चित्रकला, निबंध व वक्तृत्व स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांचे सुयश -**

दि. ०३ जुलै २०२२ रोजी उत्कर्ष ज्येष्ठ महिला मंडळ दशकपूर्ती सोहळ्यानिमित्त ज्येष्ठ नागरिक भवन नेरुळ येथे विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी विशेष अतिथी पद्मश्री स्व. सिंधुताई सपकाळ यांच्या कन्या श्रीमती ममता सिंधुताई सपकाळ, प्रमुख अतिथी मा. डॉ. अरुंधती भालेराव माजी नगरसेविका, श्रीमती नेत्रा शिर्के, उत्कर्ष ज्येष्ठ महिला मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती रेखा वाळवेकर आणि सचिव श्रीमती स्वाती पालकर इ. मान्यवर उपस्थित होते. उत्कर्ष ज्येष्ठ महिला मंडळ दशकपूर्ती सोहळ्यानिमित्त घेण्यात आलेल्या आंतरशालेय विविध स्पर्धांमध्ये विद्याभवन प्राथमिक मराठी विभागाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेवून घवघवीत यश मिळविले.

**चित्रकला स्पर्धा**

१.कु. नयना शरद वाबळे इ. ७ वी प्रथम क्र.
२.कु. मधुरा प्रशांत तरकसबंद इ. ७ वी तृतीय क्र.

**निबंध लेखन स्पर्धा**

१.कु. प्रणिती रुपेश कळंत्रे इ. ६ वी प्रथम क्र.

२.कु. मधुरा प्रशांत तरकसबंद इ. ७ वी तृतीय क्र.

**वक्तृत्व स्पर्धा**

१.कु. आमोस आनंद वाडेकर इ. ७ वी द्वितीय क्र.

**संस्थेच्या व शाळेच्या वतीने सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे हार्दिक अभिनंदन.**

## विद्याभवन पूर्व प्राथमिक इंग्रजी शाळा

### नेरूळ,नवी मुंबई शाखा

**संचालक : श्री. दिनेश मिसाळ**

**संचालक : श्री. राजेंद्र बोऱ्हाडे**

**पर्यवेक्षिका : सौ. अस्मिता सलगर**

**आंतरराष्ट्रीय योगा दिवस :-**

दि. २१ जून २०२२ रोजी पुणे विद्यार्थी गृह विद्याभवन पूर्व प्राथमिक इंग्रजी विभागातर्फे आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. पर्यवेक्षिका सौ. अस्मिता सलगर व शिक्षिकांनी सर्व विद्यार्थ्यांना ८ व्या आंतरराष्ट्रीय योगा डे च्या शुभेच्छा देऊन त्यांना योगाचे महत्व तसेच फायदे काय आहेत ते समजावून सांगितले. योगामूळे आपले तन व मन स्वस्थ राहते त्यामुळे सर्वांनी नियमितपणे योगा केला पाहिजे असे शिक्षिकांनी विद्यार्थ्याना सांगितले.

पर्यवेक्षिका सौ. अस्मिता सलगर यांनी विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या योगासनाचे प्रकार करुन दाखविले त्याचबरोबर विद्यार्थ्यांकडून योगासने करुन घेण्यात आली.

**नेचर वॉक :-**

दि. ४ जुलै २०२२ रोजी पुणे विद्यार्थी गृह विद्याभवन पूर्व प्राथमिक इंग्रजी विभागातील विद्यार्थ्यांना नेचर वॉक साठी सेक्टर १८ येथील रॉक गार्डन मध्ये नेण्यात आले होते. नेचर वॉक म्हणजे काय हे शिक्षिकांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. तसेच नेचर वॉक केल्याने काय फायदे होतात ? जसे की मेंदूला चालना मिळते,कल्पनाशक्ती वाढते, छोट्या मुलांना निसर्गातील घटकांची माहिती मिळते असे शिक्षिकांनी सांगितले.

रॉक गार्डन मध्ये गेल्यानंतर तेथील झाडे, पाने, फुले, दगड, तळ तसेच निसर्गातील इतर विविध घटकांबद्दल माहिती सांगितली. मुले, गार्डन मध्ये खूपच आनंदीत व उत्साही दिसत होती.

**रेन डे :-**

दि. ६ जुलै २०२२ रोजी रेन डे साजरा करण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांनी पावसाचा आनंद लुटला. रेन रेन गो अवे, बारिश आई बारिश आई छम छम छम अश्या काही कविता म्हणत विद्यार्थ्यांनी खुप मजा केली. तसेच गाण्याच्या तालावर विद्यार्थ्यांनी नृत्य करुन हा दिवस उत्साहात व आनंदात साजरा केला. या प्रसंगी मुख्याध्यापिका सौ. श्रीजा नायर सौ. मनिषा मुळीक या उपस्थित होत्या.

## विद्याभवन माध्यमिक इंग्रजी शाळा

### नेरूळ,नवी मुंबई शाखा

**संचालक : श्री. दिनेश मिसाळ**

**संचालक : श्री. राजेंद्र बोऱ्हाडे**

**प्र. मुख्याध्यापिका : सौ. श्रीजा नायर**

**सदिच्छा भेट :- (माध्यमिक इंग्रजी)**

दि. २२ जुलै २०२२ रोजी व अमेरिकेतील रहिवासी स्व. डॉ. शं. पां. किंजवडेकर यांचे नातू डॉ. सागर नवरे, होणारी भावी नातसून डॉ. ॲना यांनी विद्याभवन संकुल नेरुळ शाखेस भेट दिली त्यांच्या सोबत श्रीमती मृणालिनी नवरे, श्रीमती तेजस्विनी अधिकारी उपस्थित होत्या. याप्रसंगी संचालक श्री. दिनेश मिसाळ यांनी मान्यवरांचे शाल, श्रीफळ, गुलाबाचे रोप देऊन स्वागत

केले. इ. ९वी च्या विद्यार्थ्यांनी त्यांना वैयक्तिक जीवनावर आधारित प्रश्न विचारले. डॉ. सागर नवरे यांनी प्रश्नांची समर्पक उत्तरे देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

**चित्रकला, निबंध व वक्तृत्व स्पर्धेत यश :- (माध्यमिक इंग्रजी)**

उत्कर्ष ज्येष्ठ महिला मंडळ नेरुळ तर्फे दहाव्या वर्धापन दिनानिमित्त आंतरशालेय चित्रकला स्पर्धा, निबंधलेखन, वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. ज्येष्ठ नागरिक भवन, नेरुळ येथे या स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. या स्पर्धा मध्ये विद्याभवन संकुल नेरुळ येथील विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले.

दि. ३ जुलै २०२२ रोजी उत्कर्ष महिला मंडळ दशकपूर्ती सोहळ्यात यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशास्तिक व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. **तसेच या विविध स्पर्धांमध्ये विद्याभवन शाळेतील विजेत्या स्पर्धकांची संख्या जास्त असल्याने शाळेस सन्मान ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.** सदर स्पर्धेत विद्याभवन माध्यमिक इंग्रजी विभागातील खालील विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले.

**चित्रकला स्पर्धा**

१.कु. त्रिशा अंकुश आडसुळे ७ वी / अ द्वितीय क्र.
२.कु. गुंजन दत्तात्रय पार्टे ८ वी/अ द्वितीय क्र.

**निबंध लेखन स्पर्धा**

१.कु. गार्गी रुपेश कांबळे ६ वी/ब द्वितीय क्र.

**वक्तृत्व स्पर्धा**

१.कु. आर्या सागर नाक्ती ७ वी/अ प्रथम क्र.
२.कु. गौरी अशोक आहेर ७ वी/ब तृतीय क्र.
३.कु.मारिया फिरोज पटवेगार १० वी/अ प्रथम क्र.
४.कु.श्रृती रमेश पानसरे ८ वी/ब द्वितीय क्र.

**सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्या व शाळेच्या वतीने हार्दिक अभिनंदन!**

## विद्याभवन हायस्कूल(सेमी इंग्रजी) व कनिष्ठ महाविद्यालय,

### नेरूळ,नवी मुंबई शाखा

**संचालक : श्री. दिनेश मिसाळ**
**संचालक : श्री. राजेंद्र बोऱ्हाडे**
**प्र. मुख्याध्यापिका : सौ. राजकुमारी इंदलकर**

**१००% १० वी चा निकाल :- (माध्यमिक मराठी)**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे आयोजित मार्च २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत माध्यमिक मराठी विभागाचे एकूण ७१ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ०४ विद्यार्थ्यांना ९०% पेक्षा जास्त गुण प्राप्त झाले. नेरुळ शाखेच्या १००% निकालाची परंपरा या १९ व्या वर्षी कायम राहिली. परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांपैकी ५४ विद्यार्थी विशेष प्राविण्य, १५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण, ०२ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीण झाले. प्रथम आलेले चार विद्यार्थी:



कु. श्रेया साळुंखे
९४.००% प्रथम क्र.



कु. सृष्टी शिंदे
९२.४०% द्वितीय क्र.



कु. स्नेहा दगाबाज
९१.८०% तृतीय क्र.



कु. वेदिका पावडे
९१.६०% चतुर्थ क्र.

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या व शाळेच्यावतीने हार्दिक अभिनंदन!**

***

## ✻ नेरूळ शाखा - नवी मुंबई ✻



अण्णासाहेब खैर जयंती निमित्त उपस्थित संचालक श्री. दिनेश मिसाळ मुख्याध्यापिका व शिक्षक वृंद



विद्यार्थ्यांचे औक्षण करताना मुख्याध्यापक आणि शिक्षक वृंद, सोबत संचालक श्री. दिनेश मिसाळ



श्री विठ्ठल रुक्मिणीची आरती करताना संचालक श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका, विद्यार्थी व पालकवर्ग



नेचर वॉकचा आनंद लुटताना विद्यार्थी



पावसाचा मनमुराद आनंद लुटताना विद्यार्थ्यांसोबत मुख्याध्यापिका, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी

## पुणे विद्यार्थी गृहाची मुंबई शाखा विद्याभवन – घाटकोपर

**संचालक : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**संचालक : श्री. दिनेश पि. मिसाळ**

## विद्याभवन पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी व इंग्रजी विभाग,

**पर्यवेक्षिका : सौ. सिध्दी साळवी (सेमी इंग्रजी), पुजा फरिया (इंग्रजी माध्यम)**

**आषाढी एकादशी :-**

'या विठूचा गजर हरी नामाचा झेंडा रोविला.' पायी हळू हळू चाला अशा विठू नामाच्या गजरात शाळेच्या सभागृहात शुक्रवार दिनांक ०८.०७.२०२२ रोजी दिंडी सोहळयाचे आयोजन करण्यात आले. आषाढी एकादशी म्हणजे 'देवशयनी एकादशी' चातुर्मास प्रारंभ या शुभ दिनी आमच्या छोटया वारकऱ्यांनी व्यासपीठावर ज्ञानोबा माऊली तुकाराम या भजनावर एक सुंदर अभिनय सादर केला. विठूरायाच्या पालखीचे पूजन विद्याभवन प्राथमिक मराठी शाळेचे मुख्याध्यापक श्री. गणशे कणसे व विद्याभवन पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी विभागाच्या पर्यवेक्षिका सिध्दी साळवी यांच्या हस्ते झाले. विद्यार्थी - शिक्षक - पालक सर्वांनी मिळून टाळांच्या गजरात शाळेभोवती दिंडी काढली. दिंडीमध्ये विद्यार्थ्यांनी विठ्ठल, रखुमाई, संत ज्ञानेश्वर, रामदास स्वामी यांच्या वेषभूषा परिधान केल्या होत्या. दिंडी काढल्यावर आरती, पांडुरंग अष्टक घेवून कार्यक्रमाची सांगता केली. प्रसाद म्हणून मुलांना राजगि-याचे लाडू वाटले. दोन वर्षांनंतर शाळेतला पहिला कार्यक्रम पाहून मुले खूप खुश झाली. पालकांनी आपल्या छान प्रतिक्रिया दिल्या.

**गुरुपौर्णिमाः**

बुधवार दि. १३.०७.२०२२ रोजी पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी माध्यमात छोटा व मोठा शिशु वर्गाचा कार्यक्रम आप्पासाहेब गरगटे सभागृहात आयोजित करण्यात आला. व्यासांच्या प्रतिमेचे पूजन करून मुलांना धैम्य ऋषी व अरूणीची गोष्ट सांगून गुरू शिष्यांचे महत्व विशद केले. त्यानंतर ब-याच मुलांनी गुरूंविषयी आपले मनोगत व्यक्त केले. शेवटी सर्वांनी व्यासांच्या प्रतिमेला वंदन करून कार्यक्रमाची सांगता केली.

## विद्याभवन प्राथमिक इंग्रजी

**मुख्याध्यापिका : श्रीमती शुभांगी जाधव**

**आंतरराष्ट्रीय योग दिवस :**

प्राथमिक इंग्रजी विभागात योग दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. आप्पासाहेब गरगटे सभागृहामध्ये पहिली ते चौथी इयत्तानुसार सर्व विद्यार्थी जमले आणि मान्यवरांनी विविध आसन प्रकारांची प्रात्यक्षिके सादर करून ती विद्यार्थ्यांनकडूनही करून घेतली. योग शिक्षिका युक्ता अंकोला यांनी इयत्ता ३री च्या सर्व विद्यार्थ्यांना योग दिनाचे महत्त्व समजावून सांगितले आणि विविध प्रकारची आसने मुलांकडून करून घेतली. तसेच योग शिक्षिका श्रीमती अमिता धावडे व त्यांच्या सहकारी यांनी इयत्ता ४थी च्या सर्व विद्यार्थ्यांनकडून विविध प्रकारची आसने करून घेतली. तसेच त्यांना योग हा मानवी जीवनातील एक अविभाज्य घटक आहे आणि त्यामुळे शरीराला मिळणारी मानसिक शांती, समाधान तसेच शरीराची लवचिकता कशा प्रकारे वाढू शकते या बाबत मार्गदर्शन केले.

**पालक सभा :**

प्राथमिक इंग्रजी विभागातील इयत्ता १ली ते ४थी च्या वर्गांची पालकसभा दिनांक २५.०६.२०२२ ते २९.०६.२०२२ अनुक्रमे आयोजित करण्यात आली होती. या पालक सभेस इंग्रजी विभागाच्या

मुख्याध्यापिका श्रीमती शुभांगी जाधव व इयत्तेनुसार सर्व शिक्षकवर्ग उपस्थित होते. मुख्याध्यापिका श्रीमती शुभांगी जाधव यांनी प्रास्ताविक केले. तसेच प्रत्येक वर्ग शिक्षकांनी पालकांना विद्यार्थ्यांच्या सुधारणेबाबत सूचना केल्या व पालकांच्या समस्या जाणून घेऊन त्याचे निरसन केले. या पालकसभेस सर्व पालक मोठया संख्येने उपस्थित होते.

**गुरूपौर्णिमा :**

दिनांक १३.०७.२०२२ रोजी विद्याभवन प्राथमिक इंग्रजी माध्यमाच्या इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी गुरूपौर्णिमा मोठया उत्साहात आणि श्रध्दापूर्वक साजरी केली. अप्पासाहेब गरगटे सभागृहात सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या समवेत प्रथम मुख्याध्यापिका श्रीमती शुभांगी जाधव यांनी व्यासगुरूंच्या फोटोचे पूजन केले व विद्यार्थ्यांना गुरू पौर्णिमेचे महत्व सांगितले. त्यानंतर इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापिका व सर्व शिक्षकांचे औक्षण करून त्यांना गुलाबपुष्प दिले. इयत्ता तिसरी आणि चौथीच्या विद्यार्थ्यांनी गुरूपौर्णिमेनिमित्त विविध गाणी, नाटय, भाषण, नृत्य सादर केले व शिक्षकांचे कौतुक केले. शिक्षक दिनाच्या शुभेच्छा सोबतच हा दिवसही शिक्षकवर्गासाठी फार महत्वाचा असतो. सर्व विद्यार्थ्यांनी मोठया उत्साहाने गुरूपौर्णिमा साजरी केली.

## विद्याभवन प्राथमिक मराठी

**मुख्याध्यापक : श्री. गणेश कणसे**

**पालक सभा :**

प्राथमिक मराठी विभागातील इयत्ता १ली ते ४थी च्या वर्गांच्या पालकसभा दिनांक २६.०६.२०२२ ते ३०.०६.२०२२ या कालावधीत अनुक्रमे आयोजित करण्यात आल्या होत्या. या पालक सभेस मराठी विभागाचे मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे व इयत्तेनुसार सर्व शिक्षकवर्ग उपस्थित होते. सभेच्या सुरूवातीला मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे यांनी प्रास्ताविक केले. तसेच वर्षभरात शाळेत चालणा-या विविध उपक्रमांबाबत व इतर शालेय गोष्टींबाबत पालकांना मार्गदर्शन केले. प्रत्येक वर्ग शिक्षकांनी पालकांना विद्यार्थ्यांच्या सुधारणेबाबत सुचना केल्या व पालकांच्या समस्या जाणून घेऊन त्याचे निरसन केले. या पालकसभेस सर्व पालक मोठया संख्येने उपस्थित होते.

**आंतरराष्ट्रीय योग दिवस :**

प्राथमिक मराठी विभागात आंतरराष्टीय योग दिन दिनांक २१ जून २०२२ रोजी मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. आप्पासाहेब गरगटे सभागृहामध्ये इयत्ता पहिली ते चौथी इयत्तानुसार सर्व विद्यार्थी जमले. पतंजली योगपीठाच्या तज्ञ योगा मार्गदर्शक शिक्षिका वैशाली काणेकर व श्रीमती मुदूला शहा यांनी वविध आसन प्रकारांची प्रात्यक्षिके सादर करून ती विद्यार्थ्यांनकडूनही करून घेतली. सर्व विद्यार्थ्यांना योग दिनाचे महत्त्व समजावून सांगितले. आणि विविध प्रकारची आसनांचे आपल्या जीवनातील महत्व मुलांना समजावून दिले. तसेच विद्यार्थ्यांना योग हा मानवी जीवनातील एक अविभाज्य घटक आहे आणि त्यामुळे शरीराला मिळणारी मानसिक शांती, समाधान तसेच शरीराची लवचिकता कशा प्रकारे वाढू शकते या बाबत मार्गदर्शन केले.

**आषाढी एकादशी -**

दिंडी सोहळा : आषाढी एकादशीनिमित्त भक्तिमय वातावरणात दिंडी सोहळा साजरा करण्यात आला. श्री. विठ्ठल रखूमाईच्या पालखी पूजनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. आरती व विठूरायाच्या गजराने शालेय परिसर दणाणून गेला. विद्यार्थ्यांनी श्री. विठ्ठल रखूमाई व संतांच्या सुंदर वेशभूषा केल्या होत्या. शाळेच्या परिसरात भक्तिभावात दिंडी काढण्यात आली. दिंडीतील ग्यानबा-तुकारामाच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. या प्रसंगी माजी कार्याध्यक्ष श्री. कृष्णाजी

शिरकांडे सर तसेच मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे, मुख्याध्यापिका श्रीमती शुभांगी जाधव, इत्यादी मान्यवर उपस्थित होते. शाळेच्या पटांगणात पालखीभोवती रिंगण करीत विद्यार्थ्यांनी फुगडया घातल्या, शिक्षक व पालकही यात सहभागी झाले होते. अतिशय सुंदर दिंडी सोहळा साजरा झाला.

**गुरूपौर्णिमा :**

दिनांक १३.०७.२०२२ रोजी विद्याभवन प्राथमिक मराठी माध्यमाच्या इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी गुरूपौर्णिमा मोठया उत्साहात साजरी केली. अप्पासाहेब गरगटे सभागृहात सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यांसमवेत प्रथम मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे यांनी व्यासगुरूंच्या फोटोचे पूजन केले व विद्यार्थ्यांना गुरू पौर्णिमेचे महत्व सांगितले. त्यानंतर इयत्ता १ली ते ४थी च्या विद्यार्थ्यांनी गुरूपौर्णिमेनिमित्त विविध गाणी, नाटय, भाषण, नृत्य सादर केले. शिक्षक दिनाच्या शुभेच्छा सोबतच हा दिवसही शिक्षकवर्गासाठी फार महत्वाचा असतो. सर्व विद्यार्थ्यांनी मोठया उत्साहाने गुरूपौर्णिमा साजरी केली.

## विद्याभवन माध्यमिक मराठी

**मुख्याध्यापिका : श्रीमती योगिनी राजेंद्र पोतदार**

**आंतरराष्ट्रीय योग दिन :**

दिनांक २१ जून २०२२ रोजी विद्याभवन प्रशालेत आंतरराष्ट्रीय योग दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी 'आरोग्यं धन संपदा' घाटकोपर या संस्थेतील तज्ञ योगा शिक्षक श्री. दीपक बो-हाडे, श्रीमती माधवी, श्री. एल.डी, साहु आणि त्यांच्या सहका-यांनी इ. ७वी च्या विद्यार्थ्यासमोर योगासनांची सुंदर प्रात्यक्षिके सादर केली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विद्यार्थ्यांनी ही चांगल्या प्रकारे प्रात्यक्षिके केली. इतर सर्व विद्यार्थ्यांची योगासनांची प्रात्यक्षिके त्या त्या वर्गात घेण्यात आली. यावेळी मराठी विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार, इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री. सुनिल पाटील, उपमुख्याध्यापिका श्रीमती दर्शना निमकर, समन्वयक श्रीमती सरला नरेंद्रन, शिक्षक व इयत्ता ७वी चे मराठी व इंग्रजी माध्यमाचे विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहा. शिक्षिका श्रीमती चौधरी यांनी केले. तर सहा. शिक्षक श्री. अंकुश कारंडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

**रोटरी क्लब ऑफ मुंबई, घाटकोपर :**

दिनांक २४ जून २०२२ रोजी रोटरी क्लब ऑफ मुंबई, घाटकोपर यांच्या तर्फे इ. १०वी च्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केले होते. रोटरी क्लबचे अध्यक्ष श्री. प्रताप घारगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना Play Store मधून Ideal Study App डाऊनलोड करण्यास सांगितले. या मध्ये प्रत्येक विषयाचे पूर्ण पाठयपुस्तक तसेच प्रत्येक प्रकरणावर पेपर, Video तयार केलेले आहेत. तसेच Exercise सोडवून दिले आहेत MCQ दिले आहेत. या पेपरवरून विद्यार्थ्यांना परीक्षेच्या दृष्टीने चांगला सराव करता येईल. ३१ मे पर्यंत हे App चालेल. परीक्षेनंतर करिअर गाईडन्स साठी त्याचा उपयोग होईल.

**सलाम बॉम्बे फांउंडेशन -ऑनलाईन वेबिनार -**

दिनांक २५ जून २०२२ रोजी सलाम बॉम्बे फाऊंडेशन या सामाजिक संस्था व विद्याभवन हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने इयत्ता ७वी ते ९वी च्या विद्यार्थ्यांसाठी Zoom App द्वारे दुपारी २ ते ३ या वेळेत ऑनलाईन वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्री. अजय घंगाळे यांनी तंबाखूजन्य पदार्थाची माहिती देऊन त्यांच्या सेवनाने आरोग्यावर होणा-या दुष्पपरिणामांची माहिती दिली. तंबाखूजन्य पदार्थांपासून विद्यार्थ्यांनी स्वतःला लांब ठेवावे असे सांगितले. सध्याच्या कोरोनाकाळात विद्यार्थ्यांनी वैयक्तिक स्वच्छतेकडे लक्ष द्यावे. तसेच व्यसनांपासून दूर रहावे हे खूप महत्वाचे आहे हे सांगितले व तंबाखूजन्य

पदार्थाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण केली. या वेबिनारला विद्यार्थी आणि पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या वेबिनारला मुख्याध्यापिका श्रीमती. योगिनी पोतदार, वर्गशिक्षक आणि इतर शिक्षक उपस्थित होते. मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार यांनीही विद्यार्थ्यांना तंबाखूचे दुष्परिणाम, योग्य आहार आणि शारीरिक व्यायाम इ. बाबत माहिती देऊन मार्गदर्शन केले.

या उपक्रमाचे आयोजन सहा.शिक्षक श्री. अर्जुन मस्के यांनी केले होते.

**पालक सभा :**

दिनांक २७ जून २०२२ ते दिनांक २९ जून २०२२ या कालावधीत इयत्ता ५वी ते १०वी च्या वर्गांच्या पालकसभा घेण्यात आल्या. या सभेत मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार यांनी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये सर्व पालकांचे स्वागत करून एस.एस.सी मार्च २०२२ व एच.एस.सी फेब्रुवारी २०२२ या परीक्षांच्या निकालाची माहिती पालकांना दिली. तसेच एस.एस.सी चा निकाल १००% लागल्याचे सांगून सर्व विद्यार्थी, शिक्षक व पालकांचे अभिनंदन केले. तसेच पालकांना अनेक विषयांबाबत मार्गदर्शन केले. या पालकसभांना सर्व वर्गांचे वर्गशिक्षक व सर्व विद्यार्थ्यांचे पालक मोठया संख्येने उपस्थित होते. या सभेत विद्यार्थ्यांची उपस्थिती, शिस्त, दप्तराचे ओझे, अभ्यास, वाचन, लेखन, पोषण आहार, कोरोना संदर्भात घ्यावयाची दक्षता इ. विषयांवर पालकांशी संवाद साधण्यात आला. तसेच पालकांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. प्रत्येक वर्गासाठी पालक-शिक्षक संघटनेच्या पालक प्रतिनिधींची निवड करण्यात आली.

**आषाढी एकादशीनिमित्त पर्यावरण दिंडी :-**

दि. ०९.०७.२०२२ रोजी आषाढी एकादशीचे औचित्य साधून प्रशालेमध्ये 'पर्यावरण दिंडीचे' आयोजन निसर्ग मंडळातर्फे करण्यात आले होते. यावेळी प्रशालेच्या प्रांगणात 'पर्यावरण दिंडी' काढण्यात आली. या दिंडीतून हरिनामाचा गजर तसेच पर्यावरणविषयक व कोरोनासंदर्भातील जागृती करणा-या घोषणा विद्यार्थ्यांनी टाळ- गजराच्या तालामध्ये दिल्या. या दिंडीत इ.५वी ते ७वी च्या विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रूक्मिणी, अनेक संत तसेच वारक-यांच्या वेशभूषा करून उत्स्फूर्त सहभाग घेतला. तसेच सर्व शिक्षकही दिंडीत सहभागी झाले होते. या सर्व कार्यक्रमाचे आयोजन मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार यांच्या मार्गदर्शनाखाली निसर्ग मंडळातर्फे सहा. शिक्षिका श्रीमती हिरा जाधव, श्रीमती रत्नप्रभा पाटील व सहा. शिक्षक श्री. अर्जुन मस्के यांनी केले.

**गुरुपौर्णिमा :**

दि. १३ जुलै २०२२ रोजी प्रशालेत गुरूपौर्णिमा मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले गेले. सकाळी प्रार्थनेच्या वेळी श्रीमती मीनल भोळे यांनी गुरूपौर्णिमेचे महत्त्व सांगणारा सुविचार सांगून एक गीत सादर केले. तसेच गुरूपौर्णिमेची माहिती सांगितली. इयत्ता ५वी - ६वी च्या विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्रम सादर केले. कार्यक्रमाच्या सुरूवातील मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार यांनी जगतगुरू महर्षी व्यास यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून प्रतिमेचे पूजन केले. त्यांनतर विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्रमांचे उत्तम सादरीकरण केले. यावेळी विद्यार्थ्यांनी भाषण, गोष्ट, कविता, गाणी, नाटिका, समूहगीत अशा विविधरंगी कार्यक्रमांतून सर्वांना गुरू-शिष्यांच्या नात्याची ओळख करून दिली. तसेच गुरूविषयी आदर व कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी श्रीमती मीनल भोळे यांनी आपल्या आयुष्यातील गुरूंचे महत्त्वपूर्ण स्थान व गुरू -शिष्यांचे नाते कसे असावे हे सांगितले. मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार यांनीही विद्यार्थ्यांना गुरूपौर्णिमेच्या शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. विजय पाटील तर आभार प्रदर्शन श्रीमती सुनिता वायकर यांनी केले. कार्यक्रमासाठी इ.५वी ते ६वी चे सर्व विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

गुरुपौर्णिमेनिमित्त इ. ७वी - ८वी च्या विद्यार्थ्यांची मुले व मुली अशा दोन गटात फलक लेखन स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे -

इ. ७वी मुलांच्या गटातून प्रथम क्रमांक ७वी /क
सहभागी विद्यार्थी :१.सार्थक रमेश शिंदे २.अमर शिवाजी गावडे ३. पार्थ अशोक मेणे ४. आयुष सुनिल घुगे ५. गौरव उमेश ढोले

इ.७वी मुलींच्या गटातून प्रथम क्रमांक - ७वी/ अ
सहभागी विद्यार्थी :१.अनुराधा खंडू गर्जे२.हितांशा सचिन शेटे ३. निहारिका विजय आव्हाड ४. आर्या संतोष जाधव ५. श्रावणी संदीप साठे

इ. ८वी मुलांच्या गटातून प्रथम क्रमांक - ८वी /अ
सहभागी विद्यार्थी:१.शुभम विक्रांत पाचकवडे २. मंथन मंगेश गायकवाड

इ. ८वी मुलींच्या गटातून प्रथम क्रमांक ८वी /ब
सहभागी विद्यार्थी : १. निमिषा अनिल नाईक २. अंतरा संदिप शिखरे ३. वृषाली नरेंद्र वीस्टर ४. श्रावणी सचिन थोरात ५. लतिका विनायक मनकर ६. यशश्री समिर उबाळे ७. समिक्षा विनोद नरवडे ८. इच्छा ताठेले

**महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र राज्य जवाहर बालभवन निबंध स्पर्धा :-**

महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र राज्य जवाहर बालभवन मुंबई तर्फे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त संपूर्ण मुंबईतील शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन आंतरशालेय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांनी आपल्या वैचारिक व लेखन कौशल्याची चुणूक दाखवून पारितोषिके प्राप्त केली.

श्रेया रमेश सुंबे (इ.९वी -१०वी गट) - प्रथम क्र.
कोमल तुषार तोत्रे (इ. ९वी -१०वी गट) - पाचवा क्र.
सान्वी निलेश कुटे (इ. ६वी - ८वी गट) - पाचवा क्र.

**सर्व यशस्वी विद्यार्थीनींचे हार्दिक अभिनंदन व पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा !**

## विद्याभवन माध्यमिक इंग्रजी

**मुख्याध्यापक : श्री. सुनील भालचंद्र पाटील**

**पालक -शिक्षक सभा - २०२२-२३ :-**

दिनांक २७ जून २०२२ ते ३० जून २०२२ या दरम्यान विद्याभवन हायस्कूल नं. २, आप्पासाहेब गरगटे सभागृह, घाटकोपर, येथे शिक्षक - पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. सुनिल पाटील तसेच उपमुख्याध्यापिका श्रीमती दर्शना निमकर, समन्वयक श्रीमती सरला नरेंद्रन व सर्व वर्गांचे वर्ग शिक्षक, आणि विषय शिक्षक, उपस्थित होते. प्रथम सर्व वर्गांचे वर्गशिक्षक आणि विषयशिक्षक यांनी आपला परिचय देऊन आपल्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती आणि शालेय शिस्त या बाबत मार्गदर्शन केले. यानंतर प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. सुनिल पाटील यांनी इयत्ता १०वी च्या निकालाची माहिती पालकांना दिली. त्यांनी विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती, दप्तराचे ओझे, गणवेश, निटनेटकेपणा, नियमित अभ्यास करण्याचे महत्व या संदर्भात मोलाचे मार्गदर्शन केले. समन्वयक श्रीमती सरला नरेंद्रन यांनी विद्यार्थ्यांचे आरोग्य व आहार या बाबत मार्गदर्शन केले. पालक शिक्षक संघटनेच्या सदस्यांची निवड करण्यात आली. आभार प्रदर्शनाने शिक्षक - पालक सभा संपन्न झाली.

**राष्ट्रीय डॉक्टर डे -**

१ जुलै २०२२ रोजी राष्ट्रीय डॉक्टर डे साजरा करण्यात आला. सहा.शिक्षिका नंदिनी सुरी यांनी डॉक्टर बिधानचंद्र रॉय यांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. राष्ट्रीय डॉक्टर डे हा दिवस भारतरत्न डॉक्टर बिधानचंद्र रॉय यांना समर्पित आहे. विद्यार्थ्यांनी डॉक्टरां प्रती असणारी कृतज्ञता आपल्या भाषणामधून व्यक्त केली. तसेच करोनाच्या जागतिक महामारीच्या आव्हानात्मक काळात डॉक्टरांनी समाजाला आपल्या सेवेने सुरक्षित व निरोगी ठेवण्यासाठी प्रयत्नांची

पराकाष्ठा केली. या बद्दल विद्यार्थ्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

**आषाढी एकादशी :**

दिनांक ९ जूलै २०२२ रोजी विद्याभवन हायस्कूल नं. २ मध्ये आषाढी एकादशी निमित्त दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. निसर्ग मंळातील विद्यार्थी व शिक्षक या दिंडीमध्ये सहभागी झाले होते. या दिंडीत विठ्ठल रखुमाई व संत मंडळींच्या वेशभूषेत विद्यार्थ्यांनी विठ्ठलाचा नामगजर करत अभंग, गाणी व नृत्य यांचे सादरीकरण केले. विद्यार्थी व शिक्षक यांनी फुगडया घालून वारीचा आनंद लुटला. या वारीत पर्यावरण संर्वधना विषयी 'पाणी अडवा पाणी जिरवा', 'झाडे लावा झाडे जगवा' या सारख्या घोषणा देवून जनजागृती करण्याचा विद्यार्थ्यांनी प्रयत्न केला. उपमुख्याध्यापिका श्रीमती दर्शना निमकर यांनी 'सावळया विठू मला शाळेत येवू दे', या सारख्या घोषणा देऊन विद्यार्थ्यांनी शाळेत नियमित उपस्थित राहिले पाहिजे याची जाणीव करून दिली. या दिर्डीचे आयोजन सहा. शिक्षिका श्रीमती संगिता मुंढे यांनी केले होते.

**जागतिक लोकसंख्या दिन :**

दिनांक ११ जुलै २०२२ रोजी सहा.शिक्षिका श्रीमती नंदिनी सुरी यांच्या मार्गदर्शनाखाली इयता ७वी च्या मुलांनी जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त विविध उपक्रम सादर केले. विद्यार्थ्यांनी वाढत्या लोकसंख्येचे दुष्परिणाम आपल्या भाषणातून सांगितले. वाढत्या लोकसंख्येमुळे होणारा पृथ्वीचा -हास या विषयी विद्यार्थ्यांनी विविध चित्रे, पोस्टर, घोषणा तयार केल्या. 'पृथ्वी वाचवा' या विषयी विद्यार्थ्यांमध्ये जाणीव जागृती या कार्यक्रमा द्वारे केली गेली.

**गुरुपौर्णिमा :**

दिनांक १३ जुलै २०२२ रोजी प्रशालेत गुरूपौणिमा साजरी केली गेली. इयत्ता ५वी ते ८वी च्या विद्यार्थ्यांनी गुरूचा महिमा सांगणारी गीते गायिली. तसेच काही विद्यार्थ्यांनी गुरूची महती आपल्या भाषणामधून सांगितली. इयत्ता ८वी च्या विद्यार्थीनींनी सुंदर नृत्य सादर केले. तसेच काही विद्यार्थ्यांनी शाळेत शिक्षकांनी दिलेल्या सूचना ऐकणे, अभ्यास करणे, किती महत्वाचे आहे हे छोटयाशा नाटिकेतून सादर केले. प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. सुनिल पाटील यांनी आपल्या भाषणात गुरूपौणिमेचे महत्व सांगितले व विद्यार्थ्यांना अभ्यास करण्याबाबत मार्गदर्शन केले. या गुरूपौणिमा कार्यक्रमाचे आयोजन सेमिनार हॉलमध्ये निसर्ग मंडळातर्फे करण्यात आले होते. सहा. शिक्षिका श्रीमती संगिता मुंढे व सर्व सहकारी शिक्षक यांच्या सहकार्याने व मुख्याध्यापक सुनिल पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार गुरूपौर्णिमेचा कार्यक्रम दिमाखात साजरा झाला.

***

## पुणे विद्यार्थी गृहाचे कॉलेज ऑफ सायन्स अॅण्ड टेक्नॉलॉजी

**प्राचार्य : श्री. अजयकुमार पाठक**

**भक्तिमय वारी -**

जात-पात -धर्म विसरूनी प्रेमाचे माळकरी होऊ, मनात भरूनीय विठूरायला चला भक्तीचे वारकरी होऊ असाच वसा पुणे विद्यार्थी गृहाचे कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड टेक्नोलॉजी च्या मराठी वाड्मय मंडळाच्या विद्यार्थ्यांनी घेतला आहे. मागील दोन वर्ष विठूरायाच्या दिंडी मध्ये नाचणारे पाऊल, आणि टाळ-मृदूगं च्या तालावर ठेका धरणारे हाथ कोरोनाच्या बेडी मुळे अडकलेले, पण जिथे भक्ती आहे, तिथे अशक्य अस काहीच नाही. पांडुरंगाला साथ देणारी- वैकुंठाच कारभार सांभाळणारी समस्त जगाची आई आपली रखुमाई अस म्हणत हरी नामाच्या गजरात दिंडी सोहळा पार पडला. मराठी वाड्मय मंडळाने आपल्या मराठी परंपरा, साहित्य, संस्कृती जगभर पसरवण्याचा वसा घेतला आहे. विठ्ठल नामाची पालखी, भारूड, अभंग, संत गोरा कुंभार यांच्या कथांनी परिपूर्ण असा कार्यक्रम विठूरायाच्या आशिर्वादाने पार पडला.

***

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, पुणे विभाग

**कोषाध्यक्ष – श्री. आनंद कुलकर्णी** **संचालक – श्री. कृष्णाजी कुलकर्णी**

**दि. १.६.२०२२ ते ३०.६.२०२२**

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे.**
**संस्थेविषयी दर्शवित असलेल्या आत्मीयतेबद्दल सर्वांचे आभारी आहोत.**
**(देणगी व्याजाचा विनियोग देणगी प्राप्त झाल्यानंतर पुढील वर्षापासून १५ वर्षांपर्यंत केला जातो.)**

देणगी रु. १०,००१/- वरील सर्व

**नाव** - **सौ. शुभांगी दिलीप नाईक,**
**श्री. जयेश अरूण काळे,**
**सौ. अस्मिता लिमये व**
**श्री. सुनिल प्रभुणे, पुणे**
**देणगी** - रु. २,१५,००० /-



कै. बाळकृष्ण प्रभुणे



कै. मंगला प्रभुणे

**दिनांक** - ०४.०६.२०२२
**निमित्त** - कै. बाळकृष्ण मोरेश्वर प्रभुणे, कै. मंगला बाळकृष्ण प्रभुणे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - व्याजविनियोग-मिष्टान्नासह संपूर्ण भोजन व इ.९वी गणित व इतिहासात प्रथम शिष्यवृत्ती पारितोषिक

**नाव** - **श्री. दिलीप गोंविद नाईक,**
**सौ. शुभांगी दिलीप नाईक,**
**कु. नेहा दिलीप नाईक, पुणे**
**देणगी** - रु. १,६०,००० /-
**दिनांक** - ०४.०६.२०२२



कै. गोविंद नाईक



कै. पुष्पा नाईक

**निमित्त** - कै. गोविंद भिमराव नाईक व कै. पुष्पा गोविंद नाईक स्मृतिदिना निमित्त (आषाढ वद्य ३०)
**विनियोग** - व्याजविनियोग-मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

**नाव** - **श्री. श्रीकृष्ण लक्ष्मण गोडबोले, पुणे**
**देणगी** - रु. १,५०,००० /-
**दिनांक** - ०९.०६.२०२२
**विनियोग** - संस्थेतील विविध प्रकल्पांचे वाढीसाठी सदिच्छा देणगी


**नाव- सौ. मेधा जयंत कुलकर्णी, नाशिक**



कै. सदाशिव कुलकर्णी

**देणगी -** रु. १,२६,००० /-
**दिनांक -** २४.०६.२०२२
**निमित्त -** कै सदाशिव रामचंद्र कुलकर्णी(मा वि)स्मृतिदिनानिमित्त (अश्विन शुध्द ०८)
**विनियोग -** व्याजविनियोग - मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

**नाव** - **श्री. शंकर पुरुषोत्तम आठवले, पुणे**
**देणगी** - रु. १,००,१०० /-
**दिनांक** - ०७.०६.२०२२



कै. पुरुषोत्तम आठवले


कै. लक्ष्मीबाई आठवले

**निमित्त** - कै. पुरुषोत्तम सखाराम आठवले (ज्येष्ठ शुध्द १०), कै. लक्ष्मीबाई पुरुषोत्तम आठवले(चैत्र शुध्द ०३), कै. शंकर वासुदेव गाडगीळ (१३ सप्टें.) व कै.विमलबाई शंकर गाडगीळ (६ ऑक्टो) स्मृतिदिना निमित्त
**विनियोग** - व्याजविनियोग - अन्नदान

**नाव** - **श्री. रमेश शिवाजी चव्हाण (मा.वि.), पुणे**
**देणगी** - रु. ५०,००० /-
**दिनांक** - १८.०६.२०२२
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग -शैक्षणिक मदत

**नाव -श्री. स्वप्नील हेमचंद्र हजरनीस, डोंबिवली**


कै. हेमचंद्र हजरनीस

**देणगी** - रु. ५०,००० /-
**दिनांक** - २१.०६.२०२२
**निमित्त** - कै. हेमचंद्र रामचंद्र हजरनीस स्मृतिदिनानिमित्त(२८ मार्च)
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग - शैक्षणिक मदत व व्याजविनियोग - अन्नदान

**नाव** - **राष्ट्र तेज मंच, मुंबई**
**देणगी** - रु. २५,००० /-
**दिनांक** - १५.०६.२०२२
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग - शैक्षणिक मदत

**नाव -श्री. शिरीष वसंत गुमास्ते, पुणे**



कै. सौ. शिरीन गुमास्ते

**देणगी** - रु. २२,००० /-
**दिनांक** - २७.०६.२०२२
**निमित्त** - कै सौ शिरीन गिरीष गुमास्ते स्मृतिदिना निमित्त
**विनियोग**- देणगी संपूर्ण विनियोग - शैक्षणिक मदत (योगक्षेम खर्च)

**नाव** - **डॉ. वसंत गजानन जोगळेकर व सौ. विदुला वसंत जोगळेकर, पुणे**
**देणगी** - रु. २०,००४ /-
**दिनांक** - २९.०६.२०२२


कै. डॉ. गजानन जोगळेकर


कै. सौ. शालिनी जोगळेकर


कै. विनायक फाटक


कै. सौ. वसुधा फाटक

**निमित्त** - कै डॉ गजानन विनायक जोगळेकर (१० फेब्रुवारी), कै सौ शालिनी गजानन जोगळेकर (१०जून), कै विनायक रामचंद्र फाटक (२९ सप्टेंबर), कै सौ वसुधा विनायक फाटक (०८ ऑगस्ट) स्मृतिदिना निमित्त
**विनियोग** - व्याजविनियोग - अन्नदान

**नाव** - **श्री. शंकर रामचंद्र चिंचकर (मा वि), सोलापूर**
**देणगी** - रु. १५,००० /-
**दिनांक** - ०२.०६.२०२२
**निमित्त** - श्री.रामचंद्र दत्तात्रय चिंचकर वाढदिवसा-निमित्त (०१.०६.२२)
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग - शैक्षणिक मदत

**नाव** - **श्रीमती वैजंयती सदाशिव गोगावले, पुणे**
**देणगी** - रु. ११,००० /-
**दिनांक** - १३.०६.२०२२
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग - शैक्षणिक मदत

**देणगी रु. ५,००१/- ते १०,०००/-**

**नाव** - **श्री. हेमंत रामचंद्र भालेराव, पुणे**


कै. सौ. प्रभावती भालेराव

**देणगी** - रु. १०,००० /-
**दिनांक** - ०४.०६.२०२२
**निमित्त** - कै. सौ. प्रभावती रामचंद्र भालेराव स्मृतिदिना निमित्त (७ ऑगस्ट)
**विनियोग** - व्याजविनियोग - अन्नदान

**नाव** - **श्री. परेश दिलिप मुथा, पुणे**
**देणगी** - रु. १०,००० /-
**दिनांक** - ०३.०६.२०२२
**निमित्त** - सदिच्छा देणगी (ज्येष्ठ शुध्द ३)
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग -मुक्तांगण इंग्लिश स्कूल विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत

**नाव** - **श्री.रमेश भास्कर ढमढेरे, पुणे**
**देणगी** - रु. १०,००० /-
**दिनांक** - ०४.०६.२०२२
**निमित्त** - कै. रविंद्र भास्कर ढमढेरे व आई कै. श्रीमती इंदिरा भास्कर ढमढेरे स्मृतिदिनानिमित्त (२०.०६.२२)
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग - मिष्टान्न भोजनासह संपूर्ण भोजन

**नाव** - **श्री. प्रकाश चिंतामण वैद्य, पुणे**
**देणगी** - रु. १०,००० /-
**दिनांक** - २३.०६.२०२२


**कै. चिंतामण वैद्य व कै. नलिनी वैद्य**

**निमित्त** - कै. चिंतामण वासुदेव वैद्य व कै. नलिनी चिंतामण वैद्य स्मृतिदिना निमित्त (२३.०६.२३)
**विनियोग** - व्याजविनियोग - शैक्षणिक मदत

**नाव** - **श्री. विकास एकनाथ डावरे, पुणे**
**देणगी** - रु. ७,००० /-
**दिनांक** - २८.०६.२०२२
**निमित्त** - चि. रविराज विकास डावरे वाढदिवसानिमित (०१ जुलै)
**विनियोग** - मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

**नाव** - **श्रीमती सुषमा अनिल कर्वे, पुणे**
**देणगी** - रु. ६,००० /-
**दिनांक** - ०६.०६.२०२२
**निमित्त** - कै. अनिल केशव कर्वे स्मृतिदिनानिमित्त (५ जून)
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग - अन्नदान व शैक्षणिक मदत

**नाव** - **श्री. राजेंद्र अशोक चोपडा, पुणे**
**देणगी** - रु. ५,५५५ /-
**दिनांक** - १७.०६.२०२२
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग- मुक्तांगण इं.स्कूल विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत

**नाव** - **श्रीमती निता विद्याधर चिवटे, पुणे**
**देणगी** - रु. ५,००१ /-
**दिनांक** - २३.०६.२०२२
**निमित्त** - कै विद्याधर रामचंद्र चिवटे स्मृतिदिनानिमित्त (३०.०८.२२)
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग - अन्नदान

## देणगी रु. ४,००१/- ते ५,०००/-


**नाव** - **श्री. नारायण केशव कुलकर्णी**
**देणगी** - रु. ५,००० /-
**दिनांक** - ०२.०६.२०२२
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग-संस्था वाढीसाठी

**नाव** - **मिनाक्षी मधुकर करमरकर, पुणे**


कै. प्रमिला गुर्जर

**देणगी** - रु. ५,००० /-
**दिनांक** - ०३.०६.२०२२
**निमित्त** - कै.प्रमिला वामन गुर्जर जयंतीनिमित्त (४ एप्रिल)
**विनियोग**-व्याजविनियोग अन्नदान

**नाव** - **श्री. एस. एम. जिर्गे (मा.वि.), पुणे**


श्री. सुभाष जिर्गे

**देणगी** - रु. ५,००० /-
**दिनांक** - १७.०६.२०२२
**निमित्त** - कै.मल्लाप्पा शंकर जिर्गे स्मृतिदिनानिमित्त (ज्येष्ठ वद्य ४)
**विनियोग**-व्याजविनियोग- अन्नदान

**नाव** - **श्रीमती पुष्पा रविंद्र धोंगडे, पुणे**
**देणगी** - रु. ५,००० /-
**दिनांक** - ०३.०६.२०२२
**निमित्त** - कै. कृष्णाजी रामचंद्र वाघमारे(५ जुलै), कै.विठाबाई कृष्णाजी वाघमारे(१ नोव्हें), कै. रविंद्र रामकृष्ण धोंगडे (७ जून) स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग - अन्नदान

**नाव** - **श्री. विजय हरी भट, ठाणे**
**देणगी** - रु. ५,००० /-
**दिनांक** - ०६.०६.२०२२
**निमित्त** - सदिच्छा देणगी

**नाव** - **श्री. उमेश पांडुरंग गोंगाणे, पुणे**
**देणगी** - रु. ५,००० /-
**दिनांक** - ११.०६.२०२२
**निमित्त** - कै. पुष्पा पांडुरंग गोंगाणे स्मृतिदिनानिमित्त (२६.०६.२२)
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग - अन्नदान

**नाव** - **श्रीमती वर्षा प्रदिप जोशी, पुणे**
**देणगी** - रु. ५,००० /-
**दिनांक** - २८.०६.२०२२
**निमित्त** - जोशी व गोडबोले परिवारा मार्फत सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग - अन्नदान

**नाव** - **श्री. मिलिंद माधव सहस्त्रबुध्दे, पुणे**
**देणगी** - रु. ५,००० /-
**दिनांक** - ३०.०६.२०२२
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग - संस्था वाढीसाठी

### देणगी रु. ३,००१/- ते ४,०००/-

**नाव** - **श्रीमती सुनंदा जगन्नाथ देशपांडे, पुणे**
**देणगी** - रु. ४,००० /-
**दिनांक** - ०६.०६.२०२२
**निमित्त** - कै. जगन्नाथ दत्तात्रय देशपांडे स्मृतिदिना निमित्त (०९ जून)
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग - अन्नदान

### देणगी रु. २,००१/- ते ३,०००/-

**नाव - श्री. रविंद्र श्रीपाद भालेराव, (मा.वि.) पुणे**


कै. गुरुवर्य ज्योतिंद्र जी. हसबे

**देणगी** - रु. २,५०० /-
**दिनांक** - १४.०६.२०२२
**निमित्त** - कै. गुरुवर्य ज्योतिंद्र जी. हसबे स्मृतिदिनानिमित्त (२१ मे)
**विनियोग** - देणगी व्याज विनियोग - अन्नदान

**नाव** - **सौ. शुभदा पटवर्धन, पुणे**
**देणगी** - रु. २,५०१ /-
**दिनांक** - २९.०६.२०२२
**निमित्त** - कै विमलाबाई पटवर्धन स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग - अन्नदान

### देणगी रु. १,००१/- ते २,०००/-


**नाव** - **श्री. अरूण वसंत बोकिल, पुणे**
**देणगी** - रु. २,००० /-
**दिनांक** - १७.०६.२०२२
**निमित्त** - कै. सिंधु वसंत बोकिल स्मृतिदिना निमित्त (ज्येष्ठ वद्य ०६)
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग - अन्नदान

**नाव** - **सौ. अनुश्री अतुल दुर्वे, पुणे**
**देणगी** - रु. १,५०० /-
**दिनांक** - १४.०६.२०२२
**निमित्त** - स्वतःच्या वाढदिवसानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग - अन्नदान

**नाव** - **डॉ. मंदार दिलीप गद्रे, पनवेल**
**देणगी** - रु. १,५०० /-
**दिनांक** - २३.०६.२०२२
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग - अन्नदान

**नाव** - **वर्षा संजय निकम, पुणे**
**देणगी** - रु. १,५०० /-
**दिनांक** - २४.०६.२०२२
**निमित्त** - कु आर्ची संजय निकम हिचे वाढदिवसानिमित्त (२४.०६.२२)
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग - मिष्टान्न

**नाव - श्री. रामचंद्र लक्ष्मण शेटे, पुणे**


श्री. रामचंद्र शेटे

**देणगी -** रु. १,१०१ /-
**दिनांक -** ०९.०६.२०२२
**निमित्त -** स्वतःच्या वाढदिवसानिमित्त
**विनियोग -** देणगी संपूर्ण विनियोग - अन्नदान

**नाव** - **श्रीमती माधुरी निशिकांत केळकर,पुणे**
**देणगी** - रु. १,०११ /-
**दिनांक** - २१.०६.२०२२
**निमित्त** - कै. निशिकांत यशवंत केळकर स्मृतिदिना निमित्त (२१.०६.२२)
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग - अन्नदान

**नाव - श्री. पोपट मारूती शिंदे, पुणे**


श्री. पोपट शिंदे

**देणगी -** रु. १,००१ /-
**दिनांक -** ०३.०६.२०२२
**निमित्त -** स्वतःच्या वाढदिवसानिमित्त (२ जून)
**विनियोग -** व्याजविनियोग - शैक्षणिक मदत (माजी विद्यार्थी निधी पुणे)

**नाव** - **श्री. यशवंत भिकाजी तांबे (मा.वि.), पुणे**
**देणगी** - रु. १,००१ /-
**दिनांक** - ०८.०६.२०२२
**निमित्त** - स्वतःच्या वाढदिवसानिमित्त (८जून)
**विनियोग** - व्याजविनियोग - शैक्षणिक मदत (माजी विद्यार्थी निधी)

**नाव** - **सौ. भारती सतीश काळे**
**देणगी** - रु. १,००१ /-
**दिनांक** - ०८.०६.२०२२
**निमित्त** - कै. नलिनी यशवंत काळे स्मृतिदिनानिमित्त (०७.०६.२२)
**विनियोग** - देणगी संपुर्ण विनियोग - अन्नदान

**नाव** - **श्री. अनिल सहदेव सोंडकर, पुणे**
**देणगी** - रु. १,००१ /-
**दिनांक** - ०९.०६.२०२२
**निमित्त** - संस्थेच्या ११३व्या वर्धापनदिनानिमित्त सदिच्छा देणगी
**विनियोग** - संस्था वाढीसाठी

**नाव - श्री. अजित चंद्रकांत देव , पुणे**


श्री. अजित देव

**देणगी -** रु. १,००१ /-
**दिनांक -** २१.०६.२०२२
**निमित्त -** सदिच्छा देणगी वाढदिवसानिमित्त(२१.०६.२२)
**विनियोग -** देणगी संपूर्ण विनियोग - अन्नदान

**नाव - श्री. सुशिल प्रकाश काळे (मा वि), पुणे**


श्री. सुशिल काळे

**देणगी -** रु. १,००१ /-
**दिनांक -** ३०.०६.२०२२
**निमित्त -** स्वतःच्या वाढदिवसानिमित्त (३० जून)
**विनियोग -** व्याजविनियोग - शैक्षणिक मदत (माजी विद्यार्थी निधी)

**नाव** - **श्री. समीर अरविंद प्रभुणे, पुणे**
**देणगी** - रु. १,००१ /-
**दिनांक** - २५.०६.२०२२
**निमित्त** - कै अरविंद बळवंत प्रभुणे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग - अन्नदान

**नाव** - **श्री. सुरेश वासुदेव गोरे व श्री. मंदार सुरेश गोरे, पुणे**
**देणगी** - रु. १,००१ /-
**दिनांक** - २५.०६.२०२३
**निमित्त** - कै वासुदेव महादेव गोरे स्मृतिदिना निमित्त (२७.६.२०२२) व चि. मेघ मंदार गोरे इच्छानुसार सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग - अन्नदान

**देणगी रु. ५०१/- ते १,०००/-**

**नाव** - **श्री. अमरेंद्र प्रभाकर गोरे , पुणे**
**देणगी** - रु. १,००० /-
**दिनांक** - ०१.०६.२०२२
**निमित्त** - कै. शंकर रामचंद्र खरात स्मृतिदिना निमित्त (९ एप्रिल)
**विनियोग** - व्याजविनियोग - अन्नदान

**नाव** - **सौ. वैजयंती व्ही दांडेकर, रायगड**
**देणगी** - रु. १,००० /-
**दिनांक** - ०१.०६.२०२२
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग - अन्नदान

**नाव** - **श्री. अतुल शंकर सरवटे, पुणे**
**देणगी** - रु. १,००० /-
**दिनांक** - ०७.०६.२०२२
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपुर्ण विनियोग - अन्नदान

**नाव** - **श्री. संदीप लक्ष्मण मोरे (मा वि), पुणे**
**देणगी** - रु. १,००० /-
**दिनांक** - ०८.०६.२०२२
**निमित्त** - स्वतःच्या वाढदिवसानिमित्त (८ जून)
**विनियोग** - व्याजविनियोग - शैक्षणिक मदत (माजी विद्यार्थी निधी पुणे)


श्री.कृष्णाजी कुलकर्णी

**नाव** - **श्री. कृष्णाजी मारूती कुलकर्णी (मा वि), पुणे**
**देणगी** - रु. १,००० /-
**दिनांक** -०८.०६.२०२२
**निमित्त** - सौ. गौरी कृष्णाजी कुलकर्णी वाढदिवसा निमित्त (०२.०६.२२)
**विनियोग** - व्याजविनियोग - मिष्टान्न


कै. वसंतराव बाबूराव बांगर

**नाव** - **श्री. सजंय वसंतराव बांगर, पुणे**
**देणगी** - रु. १,००० /-
**दिनांक** - २०.०६.२०२२
**निमित्त** - कै. वसंतराव बाबूराव बांगर स्मृतिदिनानिमित्त (ज्येष्ठ वद्य ७)
**विनियोग**- देणगी संपूर्ण विनियोग (५०० रु.) व व्याजविनियोग (५०० रु.) - मिष्टान्नासाठी


कै. राजाराम भोसेकर

**नाव** - **ॲड. विद्याधर राजाराम भोसेकर, सोलापूर**
**देणगी** - रु. १,००० /-
**दिनांक** - २३.०६.२०२२
**निमित्त** - कै राजाराम भास्कर भोसेकर(मा वि)स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग - अन्नदान

**नाव** - **सौ. कल्पना रविंद्र सोनार, नवी मुंबई**
**देणगी** - रु. १,००० /-
**दिनांक** - २३.०६.२०२२
**निमित्त** - कु.स्वरालीचे वाढदिवसानिमित्त (२४ जून)
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग - अन्नदान

**नाव** - **श्री. सदानंद नारायण सांळुके, ठाणे**
**देणगी** - रु. ५५५ /-
**दिनांक** - २५.०६.२०२२
**निमित्त** - कै. अमरसिंग शिवराम राणे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - संस्था वाढीसाठी

**नाव** - **श्रीकांत दामोदर शिखरे, पुणे**
**देणगी** - रु. ५०१ /-
**दिनांक** - ०२.०६.२०२२
**निमित्त** - कै. सुरेश विनायक सप्तर्षी स्मृतिदिनानिमित्त (ज्येष्ठ शुध्द ३)
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग - अन्नदान

**देणगी रु. ५०० खालील सर्व**

**नाव** - **श्री. डी एम पळणीटकर, पुणे**
**देणगी** - रु. ५०० /-
**दिनांक** - ०८.०६.२०२२
**निमित्त** - प्रतिमहाप्रमाणे
**विनियोग** - देणगी -माहे जून २२ साठी

**नाव** - **श्रीमती रेखा विश्वनाथ ठकार, पुणे**
**देणगी** - रु. १०१ /-
**दिनांक** - ०२.०६.२०२२
**निमित्त** - कै. आनंदीबाई नारायण बुधकर स्मृतिदिना निमित्त (०७.०६.२२)
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग - अन्नदान

**वस्तुरुप देणगी अंदाजे मूल्य रु.**

**नाव** - **श्रीमती छाया राहुल जोग, पुणे**
**देणगी** - हापूस आंबे नग-१२५ (रु. १२,६००/-)
**दिनांक** - ४-६-२०२२
**निमित्त** - कै. मधुकर रंगनाथ जोग स्मृतिदिनानिमित्त

**नाव** - **श्रीमती यशोधरा पवार, पुणे**
**देणगी** - वीरगाथा शहादते नग - २ (रु. ५५०/-)
**दिनांक** - ०७.०६.२०२२

**नाव** - **श्री. समीर जोशी, पुणे**
**देणगी** - कथा, कादंबरी व इतर पुस्तके एकूण नग - ३३ (रु. ५००/-)
**दिनांक** - ४-६-२०२२

***



दि. १५-७-२०२२ रोजी संस्थेच्या देणगीदार डॉ. पल्लवी प्रशांत शेळके यांनी संस्थेस रु. तीस हजार इतकी देणगी दिली आहे. देणगीचा धनादेश संचालक श्री. रमेश कुलकर्णी यांस सुपूर्त करताना डॉ. पल्लवी शेळके व त्यांचे कर्मचारी.

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, पंचवटी – नाशिक शाखा

**कोषाध्यक्ष – श्री. आनंद कुलकर्णी** **कुलसचिव : श्री. अमोल जोशी**

## माहे जून २०२२

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे.**
**संस्थेविषयी असलेल्या आत्मीयतेबद्दल सर्वांचे आभारी आहोत.**

**नाव** - **श्री. श्रीकृष्ण अमृतराव देशपांडे, नाशिक**
**देणगी** - रु. ५८,४०० /-
**दिनांक** - १८.०६.२०२२
**निमित्त** - स्वतःच्या ८४व्या वाढदिवसानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग- श्री केशव महाराज मठ जिर्णोध्दारासाठी व वसतिगृहात फॅन लावण्यासाठी

**नाव** - **श्री. भास्कर वामन पाटकर (मा.वि.) नाशिक**
**देणगी** - रु. ११,००० /-
**दिनांक** - २३.०६.२०२२
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग- संस्था ऋणविमोचनार्थ

**नाव** - **श्रीमती सुनिता मार्तंड काळे,नाशिक**
**देणगी** - रु. ५,००१ /-
**दिनांक** - ४.०६.२०२२
**निमित्त** - कै. मार्तंड प्रल्हाद काळे यांच्या स्मृतिदिनानिमित्त (निर्मला एकादशी-१० जून २२)
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग- मिष्टान्न

**नाव** - **श्री. जगन्नाथ कौतिक देवरे (मा.वि.) नाशिक**
**देणगी** - रु. ५,००० /-
**दिनांक** - १९.०६.२०२२
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग- संस्था ऋणविमोचनार्थ

**नाव** - **श्री. अमोल मधुकर जोशी (मा.वि.), नाशिक**
**देणगी** - रु. २,५५१ /-
**दिनांक** - ३.०६.२०२२
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग- श्री केशव महाराज मठ पुण्यतिथीसाठी

**नाव** - **सौ. आरती अविनाश एकबोटे, नाशिक**
**देणगी** - रु. १,१११ /-
**दिनांक** - १७.०६.२०२२
**निमित्त** - कै. मिरा प्रल्हाद एकबोटे यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग- अन्नखर्च (२६ जून रोजी)

**नाव** - **श्री. गोकुळदास पुंडलीक दशपुत्रे (मा.वि.), नाशिक**
**देणगी** - रु. १,००० /-
**दिनांक** - २०.०६.२०२२
**विनियोग** - देणगी संपुर्ण विनियोग- संस्था ऋणविमोचनार्थ

**नाव** - **श्री. निरंजन रमेश दीक्षित (मा.वि.), नाशिक**
**देणगी** - रु. १,००० /-
**दिनांक** - २३.०६.२०२२
**विनियोग** - देणगी संपुर्ण विनियोग- संस्था ऋणविमोचनार्थ

**नाव** - **श्री. भागवत लक्ष्मण शेलार, पुणे**
**देणगी** - रु. ५०१ /-
**दिनांक** - २१.०६.२०२२
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग- मिष्टान्न

**नाव** - **प्रा. विकास दगडुराम कडुपाटील, पुणे**
**देणगी** - रु. ५०० /-
**दिनांक** - २१.०६.२०२२
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग- मिष्टान्न

**नाव** - **डॉ. प्रा. हणमंत संपतराव पोळ, पुणे**
**देणगी** - रु. ५०० /-
**दिनांक** - २१.०६.२०२२
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग- मिष्टान्न

**नाव** - **श्री. हर्षराज प्रविण मकवाणा,नाशिक**
**देणगी** - रु. ५०० /-
**दिनांक** - २३.०६.२०२२
**निमित्त** - कै. त्रिकमलाल देवजी मकवाणा यांच्या पुण्यस्मरणार्थ
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग- अन्नखर्च

वस्तुरुप देणगी अंदाजे मूल्य रु.

**नाव** - **सौ. राधा जोशी, नाशिक**
**देणगी** - गणपती अथर्वशिर्ष पुस्तके ६० नग, चॉकलेट
(अंदाजे मूल्य रु. ९००/-)

**नाव** - **श्री. भूषण कोमलसिंग देवरे, नाशिक**
**देणगी** - तांदुळ १० कि.
(अंदाजे मूल्य रु. ४००/-)

**नाव** - **श्री. शशांक जाणी, नाशिक**
**देणगी** - तांदूळ ५ कि.
(अंदाजे मूल्य रु. २००/-)

***

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, घाटकोपर – मुंबई शाखा

**कोषाध्यक्ष – श्री. आनंद कुलकर्णी** **संचालक – श्री. राजेंद्र बोऱ्हाडे**

**दि. ११.४.२०२२ ते २२.७.२०२२**

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे.**
**संस्थेविषयी असलेल्या आत्मीयतेबद्दल सर्वांचे आभारी आहोत.**

**नाव** - **श्री. दिपक वसंत पठाडे, मुंबई**
**देणगी** - रु. १०,००० /-
**दिनांक** - १९.७.२०२२
**निमित्त** - मुलगा चि. गंधार दिपक पठाडे यांच्या वाढदिवसानिमित्त
**विनियोग** - मुंबई शाखा वाढीसाठी

**नाव** - **श्रीमती दर्शना दिलीप निमकर, मुंबई**
**देणगी** - रु. ५,००० /-
**दिनांक** - २८.६.२०२२
**विनियोग** - मुंबई शाखा वाढीसाठी

***

# पुणे विद्यार्थी गृह फोन नंबर २४४७०९२७ / २४४७०५७३

## देणगी देण्यासाठी उपयुक्त माहिती

### पुणे आश्रम वसतिगृह निवासी विद्यार्थी संख्या १६० व इतर सेवक १०

१) अ) **एक वेळचे साधे जेवण** (पोळी, भाजी, वरण भात / पिठलं भाकरी) रु. ७,०००/-

ब) **गूळ पोळी किंवा पुरणपोळी व तूप** रु. ८,५००/-

२) अ) **मिष्टान्नासह संपूर्ण भोजन** (पोळी/पुरी, भाजी, मसाले भात/कोशिंबीर, भजी, पापड, लोणचे) रु. ९,५००/-
**गोड पदार्थ-**(गुलाबजाम/श्रीखंड/रवा, बेसन, मोतीचूर, साजूक तूपातील लाडू यापैकी फक्त एक पदार्थ)

ब) **मिष्टान्नासह संपूर्ण भोजन** (पोळी/पुरी, भाजी, मसाले भात/कोशिंबीर, भजी, पापड, लोणचे) रु. ८,०००/-
गोड पदार्थ - (शिरा / जिलेबी / शेवयाची खीर / शिक्रण / तांदळाची खिर यापैकी एक पदार्थ

३) **भोजनामध्ये मिष्टान्न / गोड पदार्थ खालील पैकी एक पदार्थ देणे**

अ) श्रीखंड / आम्रखंड / साजूक तूपातील लाडू रु. ३,५००/-

ब) गुलाबजाम / बेसनलाडू / बुंदी रु. ३,०००/-

क) शिरा / जिलेबी / शेवयाची किंवा तांदळाची खीर / शिक्रण / म्हैसूरपाक रु. २,५००/-

ड) तूपसाखर / तूपगुळ / सुधारस / केळी इ. रु. १,५००/-

४) **मिसळपाव / वडापाव / पावभाजी** रु. ६,५००/-

५) **अल्पोपहार**

अ) पोहे / उपमा / मुरमुरे चिवडा / केळी रु. १,५००/-

ब) साबुदाण्याची खिचडी रु. २,५००/-

६) **देणगी व्याजविनियोग रु. ५,०००/- व त्यापेक्षा अधिक -** देणगीदारांच्या अटी व इच्छेनुसार वाढदिवसानिमित्त, विवाह वाढदिवसानिमित्त व आप्तांचे पुण्यस्मरणार्थ प्रतिवर्षी संबंधित तिथी किंवा तारखेस देणगी दिल्यानंतर पुढील वर्षापासून १५ वर्षे अन्नदानासाठी रु. ५,०००/- आणि मिष्टान्न देण्यासाठी रु. १०,०००/- केला जातो.

७) **शिष्यवृत्ती / पारितोषिके - देणगी व्याजविनियोग** रु. १५,०००/-
इयत्तावार, विषयवार व प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या संस्थेच्या आश्रम वसतिगृहातील विद्यार्थ्यांस दरवर्षी व्याजातून शिष्यवृत्ती देणे.

८) **योगक्षेम खर्चासाठी देणगी संपूर्ण रक्कम विनियोग** **रु. २१,०००/- ते रु. २५,०००/-**
**एका वर्षाचा एका गरीब व गरजू विद्यार्थ्याचा एकूण योगक्षेम खर्च -** अ) वसतिगृह खर्च रु. १५,०००/- ब) शैक्षणिक खर्च - शालेय फी १,०००/- शालेय वह्या, पुस्तके, गणवेश, शुज, आवश्यक पुस्तके, व्यवसायमाला नवनीत व इतर खर्च रु. ५,०००/- ते १०,०००/-

९) **शैक्षणिक मदत -** जो विद्यार्थी गरीब, गरजू व हुशार आहे. असा विद्यार्थी प्रथम / द्वितीय / तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण होतोच असे नाही अशा विद्यार्थ्यास शैक्षणिक मदत देणे हे जास्त सोयीचे व उपयोगी ठरते. त्यासाठी देणगीदारांच्या इच्छेनुसार देणगी स्वीकारली जाते. देणगीचा संपूर्ण रक्कम विनियोग फक्त एकदा व देणगीच्या व्याजाचा विनियोग १५ वर्षे अशा दोन प्रकारे विनियोग केला जातो . (व्याज विनियोगासाठी रु. १,५०००/- व त्यापेक्षा जास्त रक्कम अपेक्षित आहे.)

१०) **देणगी रोख अथवा धनादेशाद्वारे स्वीकारली जाते. धनादेश कृपया 'पुणे विद्यार्थी गृह' या नावाने काढावा.**

११) **याखेरीज विद्यार्थ्यास (इ. ५ वी ते १० वी) उपयुक्त कपडे / धान्य इ. साहित्य स्वीकारले जाईल.**

१२) **या देणगीवर आयकर खात्याच्या कलम ८० जी नुसार ५० टक्के आयकरात सवलत मिळते.**
**तरी कृपया भरीव देणगी देऊन संस्थेच्या कार्यास सहकार्य करावे ही नम्र विनंती.**

## ❋ मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ❋




मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय येथे गुरुपौर्णिमेनिमित्त प्रमुख पाहुण्या डॉ. सुप्रिया अत्रे यांचा सत्कार करताना संचालक श्री. रमेश कुलकर्णी




मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय येथे गुरुपौर्णिमेनिमित्त प्रमुख पाहुण्या डॉ. सुप्रिया अत्रे यांच्याकडून शिष्यवृत्ती परीक्षेत भरघोस यश प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले.

## ❋ विद्याभवन, घाटकोपर - शाखा मुंबई ❋



विद्याभवन हायस्कूल नं. २ विभागाच्या निसर्ग मंडळाच्या विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशीनिमित्त दिंडी सादर केली.



योग दिनानिमित्त विद्याभवन प्राथमिक इंग्रजी विभागाचे इ. ३ री चे विद्यार्थी योगाची प्रात्यक्षिके करताना सोबत योग शिक्षिका, श्रीमती युक्ता अंकोला विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना.

Regd. Newspaper
Postal Reg. No. PCW / 168 / 2020-2022, Office of Posting *Pune PSO *GPO 411 001*
[Publication Date 13.8.2022 Posting Date 15.8.2022 ]
SAMACHAR - RNI No. 14546 / 1957. Decl. No. SDO / PUNE / SR / 74 / 2016
License No. WPP - 56 / 2020 - 2022



दि. २९-७-२०२२ रोजी संस्थेचे देणगीदार प्रो. आशुतोष मराठे यांनी संस्थेस रु. एक लाख दहा हजार इतकी भरीव देणगी दिली आहे. त्यांचा सत्कार करताना कार्याध्यक्ष श्री. सुनील रेडेकर. सोबत श्री. अमरेंद्र मराठे



दि. २९-७-२०२२ रोजी संस्थेचे देणगीदार श्री. संजीव मोघे यांनी संस्थेस रु. एक लाख इतकी भरीव देणगी दिली आहे. त्यांचा सत्कार करताना संचालक श्री. कृष्णाजी कुलकर्णी

♦ पुणे विद्यार्थी गृह ♦

▣ पुणे शाखा - (०२०) २४४७०९२७, २४४७०५७३, २४४७९०५८
▣ मुंबई शाखा : (०२२) २५०६२३२२ फॅक्स : (०२२) २५०६४९३५ ▣ नवी मुंबई (नेरुळ) (०२२) २७७२३४१८
▣ नाशिक शाखा : (०२५३) २५११३०६ ▣ म्हसरुळ: (०२५३) २५३४२९१ ▣ तळेगाव अंजनेरी शाखा: (०२५९४)२२२२२७

कृपया आपल्या प्रतिक्रिया pvgsamachar@gmail.com या ई मेल वर नोंदवाव्यात.

This monthly Samachar is printed on behalf of Pune Vidyarthi Griha by Printer and Publisher Mr. Subhash Mallappa Jirge at Maharashtra Mudranshala Chhapkhana, 1786, Sadashiv Peth, Pune 411030 and Published at Pune Vidyarthi Griha, 1786, Sadashiv Peth, Pune 411030.
Editor : Mr. Sunil Pandurang Redekar

समाचार हे मासिक पुणे विद्यार्थी गृह संस्थेकरिता मुद्रक, प्रकाशक श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे यांनी महाराष्ट्र मुद्रणशाळा छापखाना, १७८६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे छापून पुणे विद्यार्थी गृह, १७८६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे प्रसिद्ध केले.
संपादक श्री. सुनील पांडुरंग रेडेकर